विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००७ |
| वर्ष | : | आठवे |
| अंक | : | ८ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या “ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १२०**

MAHMAR/ 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
व्ही. पी. एम्.
दिशा
वर्ष आठवे / अंक ८ / ऑगस्ट २००७

## संपादकीय
## शैक्षणिक अनुभव देणारी चीन भेट

विद्या प्रसारक मंडळाच्या घटक संस्थांमध्ये होणारे कार्यक्रम, त्या कार्यक्रमांचे विषय, विषयांतील वैविध्य पाहता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक संस्था म्हणून विद्या प्रसारक मंडळ करीत असलेले महत्त्वाचे योगदान लक्षात येते. विविध प्रसंगांच्या निमित्ताने विविध विषयांतील नामवंत, कर्तृत्वान मंडळी शाळा व महाविद्यालयांच्या परिसरात येतात, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात.

विद्यार्थी जीवनात या संस्कारक्षम कार्यक्रमांचे महत्त्व अनन्यसाधारण असते. या कार्यक्रमांचे आयोजन, त्यातील सहभाग यांच्या अनेक आठवणी विद्यार्थ्यांचे जीवन, पुढील जीवनातील या जडणघडणीच्या काळातील मधुर स्मृती समृद्ध करतात. अगदी लहान वर्गाच्या शिशुंपासून संशोधन स्तरापर्यंतच्या कार्यक्रमांचा वेध घेतला तर, ठाणे शहराच्या इतिहासातील विद्या प्रसारक मंडळ व मंडळाच्या घटक संस्थांचे असणारे योगदान मोठे ठरेल.

या कार्यक्रमांचे लहान सहान तपशीलही फार महत्त्वाचे असतात. प्रत्यक्ष आयोजनातील, आखणीतील सहभागापासून ते कार्यक्रमाच्या पुढील पाठपुराव्यापर्यंत सर्व महत्त्वाचे असते. बदलत्या काळाचा, या काळात अंगभूत असणाऱ्या कुशल व्यावसायिकेतचा कार्यक्रमांवर परिणाम होतच जाणार आहे. बांधणी आखीव रेखीव असण्याचे महत्त्व या संबंधातील प्रत्येक घटकाला जाणवत राहणार आहे. दिशाच्या परिसरवार्तात या कार्यक्रमांची नोंद घेण्याचा प्रघात, त्यासाठी महत्त्वाचा आहे.

या पार्श्वभूमीवर आमच्या सौ. आनंदी बाई जोशी विद्यालयातील विद्यार्थ्यांची चीन भेट फार महत्त्वाची व अभिमानाची वाटावी अशी ऐतिहासिक भेट आहे. शालेय विद्यार्थ्यांमधील सृजनशीलतेला वाव मिळावा या दृष्टीने चीनमध्ये 'किशोर विज्ञान तंत्रज्ञान नवकल्पना स्पर्धा (China Adolescent Science and Technology Inovation Contest) म्हणजेच (ASTIC) प्रतिवर्षी होते. अंतरराष्ट्रीय स्तरावरील या कल्पक प्रकल्प स्पर्धेसाठी आमच्या विद्यार्थ्यांना निमंत्रण मिळाले हे फार महत्त्वाचे आहे.

ठाण्यातील प्राच्य विद्या अभ्यास संस्था अशा प्रकारच्या शैक्षणिक सहली, उपक्रम आयोजित करणारांना सक्रिय सहकार्य करते. प्रवास खर्चाची तयारी दाखविणाऱ्या पालकांचे पाल्य - विद्यार्थी, शिक्षक यांच्यासाठी या संस्थेने आयोजित

(पान क्र. ४०वर)



व्ही. पी. एम्.

# दिशा


वर्ष आठवे / अंक ८ / ऑगस्ट २००७



संपादक
डॉ. विजय बेडेकर

कार्यकारी संपादक
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १२ वे / अंक १३)

कार्यालय
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

मुद्रण स्थळ :
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email perfectprints@gmail.com


## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | महायोगी श्रीअरविंदाचा स्वातंत्र लढ्यातील सहभाग (लेखांक २) | श्री. नरेन्द्र नाडकर्णी | ३ |
| २) | सूर्योपासना (लेखांक तिसरा) | श्री. शं.बा. मठ | १० |
| ३) | ओळख काही प्रतीकांची | प्रा. श्रीनिवास मेघःश्याम आठल्ये | १४ |
| ४) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | १७ |
| ५) | किशोरांची नवनिर्मिती स्पर्धा: चीनचा स्तुत्य उपक्रम | डॉ. सुधाकर आगरकर | २६ |
| ६) | आमची चीन यात्रा | सौ. अपर्णा सतीश भोळे | ३० |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | ३४ |



या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# महायोगी श्रीअरविंदाचा स्वातंत्र लढ्यातील सहभाग -

## लेखांक २

*श्रीअरविंदांची १५ ऑगस्टला जयंती आहे. त्यानिमित्ताने त्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या पर्वाची माहिती देणारा हा लेख* - संपादक

### कृतिशील प्रतिकार

भारतात परत आल्यावर श्रीअरविंदांनी एकंदर परिस्थितीचे अवलोकन केले. आपल्या लिखाणातून आणि भाषणांतून लोकजागृती करण्याचा प्रयत्न केला. परंतु हे सर्व करत असताना त्यांच्या मनांत विचार घोळत होता तो मात्र सशस्त्र उठावाचा. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस बंदूक हेच प्रमुख शस्त्र होतं. विमान, रणगाडे, फार मोठा विध्वंस करणारे बॉम्बज् यांचा तोपर्यंत शोध लागलेला नव्हता. ब्रिटिशांच्या सैन्यांत फार मोठ्या प्रमाणावर भारतीयांचाच भरणा होता. सारा देश जागृत झाल्यास हे सैनिकही बंड करुन उठले असते. आणि मग देशाच्या निरनिराळ्या भागांत एकाचवेळी उठाव करुन ब्रिटिशांना कोंडीत पकडता आलं असतं. अरविंदाना इंग्रजांच्या मानसिकतेचीही पूर्ण जाणीव होती. परिस्थिती हाताबाहेर जात आहे हे पाहिल्यास ते आपण होऊन भारताला स्वातंत्र्य बहाल करतील व इथून निघून जातील याची त्यांना खात्री होती. मात्र यासाठी हळू हळू फार मोठी संघटना निर्माण करणं आवश्यक होतं.

### क्रान्तिकारकांचे संघटन

१८९८ च्या सुमारास जे. एन. बॅनर्जी नावाचा एक बंगाली तरुण लष्करी शिक्षण घेण्यासाठी बडोद्यास आला. श्रीअरविंदांनी त्याची बडोदा संस्थानच्या सैन्यात शिक्षणाची सोय केली. शिक्षण पूर्ण झाल्यावर श्रीअरविंदांनी सांगितल्याप्रमाणे तो बंगालमध्ये गेला. यं. मित्रा व श्री भट्टाचार्य इत्यादी क्रान्तिकारकांशी त्याने संबंध जोडले. पुढे 'निरालंब स्वामी' हे नाव धारण करुन तो उत्तर भारतात गेला. क्रान्तिकारकांच्या छोट्या छोट्या संघटना निर्माण करुन त्यांना लष्करी शिक्षण देण्याचे कार्य तो करत होता. लाला हरदयाळ व रासबिहारी बोस सारखे देशभक्त त्याच्या प्रभावातून निर्माण झाले. याच सुमारास अरविंदाचा धाकटा भाऊ बारिन्द्र हाही क्रान्तिकार्यात सामील झाला. क्रान्तिकारकांच्या संघटना तयार करणं, बॉम्बज् तयार करणं, ते करण्याचं प्रशिक्षण इतरांना देणं इत्यादी कार्यांत तो मग्न राहिला.

या दोघांना हाताशी धरुन चालू केलेल्या कार्याला १९०३ साली जतिन मुखर्जी या थोर क्रान्तिकारकाची जोड मिळाली. जतिन व निरालम्ब स्वामी यांच्या प्रयत्नानं आणि प्रभावानं ब्रिटिश सैन्यातील अनेक तरुण क्रान्तिकार्यात सामील झाले. जतिननं कलकत्यापासून दार्जिलिंगपर्यंत खेडोपाडी आपल्या संघटना निर्माण केल्या. त्यानं हळू हळू परदेशांतही संबंध प्रस्थापित केले. तारकनाथ दास व गुरुंदितकुमार हे लष्करी शिक्षण घेण्यासाठी तसेच आपल्या स्वातंत्र्यलढ्याला परदेशांत सहानुभूती मिळवून अर्थसहाय्यही प्राप्त करण्याच्या उद्देशाने अमेरिकेत गेले. अमेरिका, कॅनडा व जर्मनी येथे त्यांनी जे संबंध प्रस्थापित केले. त्याच्या प्रभावातूनच पुढे ''गदर'' चळवळ फोफावली. जतिनच्या दबदब्यामुळे तो त्याकाळी ''जतिन वाघ्या'' म्हणून प्रसिद्ध झाला.

याच सुमारास उदेपूरच्या ठाकुरांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करणाऱ्या श्री. मांडवले या क्रान्तिकारकाला अरविंद

भेटले. अशा तऱ्हेनं बंगाल, उत्तर भारत व पश्चिम भारत येथील क्रान्तिकारकांना त्यांनी एकत्र जोडले.

श्रीअरविंद या सर्व क्रान्तिकारकांशी संपर्क ठेवत होते. त्यांना मार्गदर्शन करत असत. शिवाय देशप्रेमाची व स्वातंत्र्य प्राप्त करण्याची प्रेरणा त्यांच्यापासूनच क्रान्तिकारकांना मिळत होती. मात्र त्यांच्या दैनंदिन कारभाराशी आणि विशेषत: हिंसक कारवायांशी अरविंदांचा थेट संबंध नव्हता. एखाद्या स्थानिक इंग्रजाच्या उद्दामपणाने भडकून जाऊन एखादा क्रान्तिवीर त्याला खतम् करत असे. पण अशा पद्धतीनं एखाद दुसऱ्या इंग्रजाला ठार मारुन स्वातंत्र्य मिळणार नाही, याची त्यांना पूर्ण जाणीव होती. या सर्व संघटना त्यांना बांधायच्या होत्या त्या अंतिम लक्ष्यासाठी.

### भवानी मंदिर

आता श्रीअरविंदांना संन्यस्तवृत्तीनं कार्य करणाऱ्या तरुण प्रचारकांचीही गरज भासू लागली होती. आणि यांतूनच त्यांची ''भवानी मंदिराची'' कल्पना उदयास आली. एखाद्या दुर्गम भागांत भवानी मातेचं म्हणजेच शक्ती देवतेचं मंदिर उभारावं. ब्रह्मचर्याचं पालन करू इच्छिणाऱ्या तरुणांना एकत्र करावं. त्या तरुणांनी एका बाजूला शक्तीसाधना करत दुसऱ्या बाजूला ठिकठिकाणी फिरुन जनजागृती करावी, समाजप्रबोधन करावं, रुग्णसेवा करावी अशी ती योजना होती. पुढे अचानक वंगभंगाची चळवळ सुरु झाली आणि त्यामुळे ही योजना राबवण्याइतका अवसर अरविंदांना मिळाला नाही. तरी भवानी मंदिराची योजना विशद करणारी जी पुस्तिका होती त्यांतील विचारांनी अनेक तरुणांमध्ये शक्तीसाधनेची आणि देशभक्तीची प्रेरणा निर्माण झाली.

### वंगभंगाची चळवळ

२० जुलै १९०५ रोजी वंगभंगाचे बिल पास झाले. ऑक्टोबर १९०५ मध्ये बंगालची फाळणी होणार हे सरकारनं जाहीर केलं. या जाहीरनाम्यानं साऱ्या बंगालमध्ये असंतोषाचा वणवा पेटला. त्याचे पडसाद साऱ्या देशांत उमटू लागले. ब्रिटिशांच्या विरोधांत रान उठवण्यासाठी ही एक ईश्वरदत्त अशी सुवर्णसंधी आहे हे श्री अरविंदांनी जाणलं. आणि लवकरच दीर्घ मुदतीची रजा घेऊन त्यांनी कलकत्त्यास प्रयाण केलं.

बंगालमध्ये गेल्यावर श्रीअरविंदांनी बिपिनचन्द्र पाल यांच्या जोडीनं ठिकठिकाणी सभा घेतल्या, मेळावे आयोजित केले, काही ठिकाणी दडपशाहीच्या विरोधात निघालेल्या मोर्चाचं नेतृत्व केलं. अशा रीतीनं अरविंद आता उघडपणे लोकनेत्याच्या स्वरुपात लोकांना दिसू लागले. जसजसा लोकांचा विरोध वाढू लागला, तसतशी सरकारची दडपशाही वाढू लागली. आणि मग या दडपशाहीशी तिथल्या तिथे मुकाबला करण्याची गरज भासू लागली. बारिन् जतिन यांच्या नेतृत्वाखाली तयार झालेले क्रान्तिकारकांचे छोटे छोटे गट या दडपशाहीला सशस्त्र प्रतिकार करु लागले. ''युगांतर'' या नावाचं पत्रक बारिन व जतिन यांनी सुरू केलं. त्यांतून सशस्त्र प्रतिकाराचा उघड पुरस्कार केला जाऊ लागला.

### बहिष्कार-शांततामय असहकार - स्वदेशी

एका बाजून कृतिशील प्रतिकार होत असतानाच दुसऱ्या बाजूनं कोणतीही कृती न करता शांततामय असहकार सुरु करावा असं अरविंदांना जाणवू लागलं. कारण ब्रिटिश सरकारच्या राज्ययंत्रणेत, न्यायव्यवस्थेत प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे सहकार्य करणं, त्यांच्या शिक्षण संस्थांचा लाभ घेणं, त्यांच्या देशातून आलेला माल खरेदी करणं अशा गोष्टींनी ब्रिटीशांचे हात मजबूत होत आहेत हे त्यांना जाणवलं. आणि म्हणून ठिकठिकाणी भरणाऱ्या सभांतून त्यांनी परकीय मालावर बहिष्कार टाकण्याचं जनतेला आवाहन केलं. बिपिनचन्द्र पाल यांच्या पुढाकारानं सुरु

झालेल्या ''वन्दे मातरम्'' या वर्तमानपत्राची संपूर्ण जबाबदारी श्रीअरविंदावर सोपविण्यात आली होती. शांततामय असहकारामागील आपली भूमिका, असहकाराचे निरनिराळे मार्ग आणि त्यावरील पर्याय स्पष्ट करण्यासाठी अरविंदांनी ''वन्दे मातरम'' मध्ये ८ लेख लिहिले. त्याकडे एक नजर टाकून त्यांतील विचार जाणून घेऊ.

**१) आर्थिक बहिष्कार आणि स्वदेशीचा पुरस्कार :**

इंग्रज इथे आले ते व्यापार करण्यासाठी. सत्ता संपादन केल्यावर तर त्यांना हक्काची बाजारपेठ मिळाली. यांतूनच त्यांनी आपल्या देशाचं आर्थिक शोषण सुरु केलं आणि म्हणून त्यांच्या मालावर बहिष्कार टाकून त्यांच्या शक्तिस्थानावर प्रहार करण्याचा हा शांतिपूर्ण मार्ग त्यांनी दाखवला. मात्र याचवेळी आपल्या उद्योगधंद्यांनाही चालना मिळेल हे पाहून, ब्रिटिशांवरील आर्थिक बहिष्काराबरोबर स्वदेशीचा पुरस्कार सुरू केला.

पुढे गांधीजींनी याच मुद्याला महत्त्व दिलं. आणि देशभर चरखे चालवून ब्रिटीशांच्या नाकांत दम आणला. गांधीजीच्या या कृतीमागील विचारांची बैठक गांधीजी भारतात येण्यापूर्वी १० ते १५ वर्ष आधी तयार झाली होती, हे विसरुन चालणार नाही.

**२) शैक्षणिक बहिष्कार - राष्ट्रीय शिक्षण :**

भारतांतील सत्तेवरील आपली पकड घट्ट करण्यासाठी ब्रिटिशांनी ज्या निरनिराळ्या क्लुप्त्या लढवल्या त्यांतील सर्वात जास्त परिणामकारक आणि दूरगामी ठरणारी म्हणजे इंग्रजी शिक्षण देणाऱ्या संस्था सुरु करणं. वस्तुत: इंग्रजी शिक्षणामुळे पाश्चिमात्यांनी संपादन केलेल्या आधुनिक ज्ञानाची, विज्ञानाची भारतीयांना ओळख झाली. तसेच आयर्लंड, इटली वैगरे देशांतील स्वातंत्र्यलढ्यांची माहिती मिळाल्यामुळे अनेक तरुणांच्या मनांत स्वातंत्र्याची भावना उफाळून आली. या व अशा काही गोष्टींमुळे भारताचा फायदा झाला हे नाकारता येणार नाही. पण प्रश्न केवळ इंग्रजी शिक्षणाचा नव्हता. इंग्रजांनी शिक्षणसंस्था काढल्या होत्या त्या मुख्यत: त्यांना त्यांच्या कामासाठी दुय्यम दर्जाचे ''बाबू'' लोक हवे होते म्हणून. शिवाय या दुय्यम दर्जाच्या कामाच्या शिक्षणांत भारतीय संस्कृती, भारताचं गतवैभव आणि राष्ट्रीयत्वाची भावना यांचा विसर पडावा अशी पद्धतशीर योजना होती. आणि म्हणून अशा प्रकारच्या शिक्षणसंस्थांवर बहिष्कार टाकावा असं आवाहन श्रीअरविंदांनी केलं. मात्र याला पर्याय म्हणून ठिकठिकाणी राष्ट्रीय शाळा, महाविद्यालये सुरू करण्याचेही प्रयत्न या सर्व नेत्यांनी केले. खुद्द कलकत्त्यात राष्ट्रीय महाविद्यालय स्थापन झालं. तेव्हा श्रीअरविंदांनी बडोदा संस्थानातील रु. ७५० पगार देणाऱ्या उपप्राचार्यपदाचा त्याग केला व कलकत्त्यास राष्ट्रीय महाविद्यालयांत रु १५० पगारावर रुजू झाले.

**३) इंग्रजांनी स्थापन केलेल्या न्यायालयांवर बहिष्कार** टाकून राष्ट्रीय न्यायालय चालवण्याचाही प्रस्ताव होता. परंतु ग्रामीण विभागांत गांवपंचायतींचा पर्याय जरी निर्माण करता आला असता, तरी शहरी भागांत असा पर्याय देणं कठीण होतं. शिवाय काही अपवाद वगळता अनेक इंग्रज न्यायाधीश न्यायबुद्धीनं निर्णय देत, हे मान्य करावं लागेल.

**४) इंग्रजांच्या राज्यशासनावर बहिष्कार टाकणे** हा आणखी एक मार्ग. श्रीअरविंद म्हणत, की जर एकाही भारतीयानं ब्रिटिशांच्या शासनयंत्रणेत चाकरी केली नाही तर त्यांना ताबडतोब देश सोडून जावं लागेल. महात्माजींनीही पुढे अशाच अर्थाचं आवाहन केलं होतं आणि अनेकांनी आपल्या सरकारी नोकरीचा राजीनामा दिला. राज्यशासनाला जेरीस आणण्यासाठी कर देण्यास नकार देण्याचा मार्गही श्रीअरविंदांनी दाखवला होता.

५) भारतमातेला मुक्त करण्यासाठी अरविंदांना किती तळमळ लागून राहिली होती आणि त्यासाठी मध्ये येणाऱ्या सर्व अडथळ्यांना दूर करण्यासाठी ते किती धडपडत होते, त्याचा दाखला म्हणजे सामाजिक बहिष्काराचं आवाहन. जे भारतीय इंग्रजांच्या निरनिराळ्या अमिषांना बळी पडून इंग्रजांची चाकरी करत आणि स्वातंत्र्यलढ्याशी गद्दारी करत त्यांच्यावर देशप्रेमी समाजानं बहिष्कार टाकावा, असं ते आवाहन होतं. मात्र अशा विचारांचा समाजात कधी कधी दुरुपयोग होतो हे पाहून त्याबद्दल त्यांनी नापसंती दर्शवली व असे बहिष्कार आत्यंतिक परिस्थितीत घालावे अशी सूचना केली. यावरून प्रत्येक प्रश्नाचा ते सखोल अभ्यास करत हे दिसतं. शिवाय आपल्या वाट चुकणाऱ्या बांधवांबद्दलही त्यांना सहानुभूती होती हे दिसून येतं.

बहिष्काराच्या मार्गानं सरकारशी शांततामय असहकार करण्याची योजना जरी अरविंदांनी आखली आणि राबवली तरी कृतिशील प्रतिकाराला त्यांनी नकार दिला नाही. या लेखमालेची अखेर करताना ते म्हणतात की, शांततामय असहकारालाही शौर्याची, धैर्याची आणि मर्दानीपणाची झालर हवी.

### सुरत कॉंग्रेस - नॅशनॅलिस्ट पार्टी

लोकमान्य टिळक आणि अरविंद घोष यांच्या नेतृत्वाखाली जहालांचा पक्ष एका बाजूला इंग्रजांशी झगडत होता तर दुसऱ्या बाजूला कॉंग्रेस पक्षानं आपला कार्यक्रम स्वीकारावा यासाठी मवाळांशी झगडत होता. लक्ष्य होतं १९०७ च्या सुरत कॉंग्रेसकडे.

अधिवेशन सुरू होताच लोकमान्यांनी लाला लजपतराय यांचं नांव अध्यक्षपदासाठी सुचवलं. मवाळांना ते मान्य नव्हतं. खूप बखेडा माजला. सर्वत्र गोंधळ उडून शेवटी ती सभा उधळली गेली. मग जहाल गटानं अरविंदांच्या अध्यक्षतेखाली वेगळी सभा घेतली. मुख्य भाषण टिळकांचं झालं. मवाळ आणि जहाल यांच्या वाटा आतां वेगळ्या झाल्या होत्या. जहालांना यापुढे नॅशनॅलिस्ट पार्टी म्हणून ओळखू लागले. या प्रसंगाने लो. टिळक आणि अरविंद एकमेकांच्या खूप जवळ आले. सुरत कॉंग्रेसनंतर कलकत्त्यास परतताना अरविंद महाराष्ट्रात येऊन गेले. मुंबई, पुणे, नाशिक, अमरावती व नागपूर येथे त्यांच्या मोठ्या सभा झाल्या.

### किंग्जफोर्डचा उद्दामपणा

जसजशी समाजाची स्वातंत्र्याची तहान वाढत होती तसतशी सरकारची दडपशाही वाढत होती. सार्वजनिक ठिकाणी वन्दे मातरम् घोष करणं गुन्हा ठरला होता. खरं म्हणजे वन्दे मातरम् म्हणजे काय, तर मातेला अभिवादन. तेही करायची कायद्याने बंदी. कसं सहन करायच हे तिच्या मुलांनी? असाच एक, सुशील सेन नावाचा १५ वर्षाचा कोवळा मुलगा. वन्दे मातरम्ची घोषणा दिली म्हणून पोलिसांनी त्याला पकडलं आणि न्यायालयात उभं केलं. किंग्जफोर्ड नावाच्या उद्दम न्यायाधीशानं त्या पोराला चाबकानं फटके मारायची शिक्षा दिली. पोलिसांनी भर कोर्टातच त्याला फटके मारायला सुरुवात केली. शेवटी त्या मारानं वन्दे मातरम् चा घोष करत सुशील खाली कोसळला आणि गतप्राण झाला. ही बातमी वाऱ्यासारखी सर्वत्र पसरली. सारा बंगाल खवळून उठला. सुशीलच्या निर्घृण हत्येचा बदला घेण्यासाठी किंग्जफोर्डला यमसदनी धाडण्याचा निर्धार खुदीराम बोसने केला. कलकत्त्यातील तापलेलं वातावरण पाहून सरकारनं किंग्जफोर्डची बदली मुझफ्फरपूरला केली. खुदीराम तिथेही त्याच्या मागावर गेला. संधी साधून खुदीरामनं त्याच्या गाडीवर बॉम्ब फेकला पण दुर्दैवानं, त्यावेळी साहेब गाडीत नव्हता. दुसऱ्याच दोन इंग्रज स्त्रिया होत्या. त्या मृत्यूमुखी पडल्या. या घटनेमुळे सर्वत्र धरपकड सुरू झाली.

## माणिकतोळा उद्यान

या काळात श्रीअरविंदांचा धाकटा भाऊ वारिन् हा आपल्या सहकाऱ्यांसह माणिकतोळा उद्यानांत बॉम्बज बनवत असे. या माणिकतोळा उद्यानांत असलेल्या अरविंदांच्या खाजगी जागेत तो एक संस्कार केंन्द्र चालवत होता. तिथेच लपून छपून ही इतर कामेही चालत. वरील घटना घडल्यावर, अरविंदांनी वारिनला जागं करुन काही सूचना केल्या. वारिन व त्याचे सहकारी तातडीने उद्यानांत गेले. तिथे असणारी सर्व कागदपत्र त्यांनी फाडून टाकली. काही मुद्देमाल हाती लागू नये म्हणून जमिनीत पुरुन टाकला. नंतर सर्वजण थकून झोपले. उठून पाहतात तो पोलिसांचा गराडा पडला होता. वारिन व त्याचे सहकारी पकडले गेले. तिथून पोलिस तडक निघाले आणि त्यांनी अरविंदांनाही अटक करुन अलिपूरच्या तुरुंगात धाडलं.

## अलिपूरचा तुरुंगवास

अलिपूरच्या तुरुंगात श्रीअरविंद जवळ जवळ वर्षभर बंदिवासात होते. हा बंदिवास त्यांना का घडला? या काळात ते काय करत होते? त्यांच्या जीवनात कोणतं परिवर्तन घडलं? बंदिवासातून त्यांची सुटका कशी झाली? इत्यादी प्रश्न आपल्या समोर उभे राहतात.

एखाद्या व्यक्तीच्या जीवनात एखादी घटना घडते तेव्हा आपण आपल्या दृष्टिकोनांतून, आपल्या बुद्धीने, आपल्या जाणीवेनं त्या घटनेचा अर्थ लावतो. पण अनेकदा अशा काही वैशिष्ट्यपूर्ण घटना दैविक योजनेनं घडत असतात आणि त्यामुळे त्यांचा अर्थ अथवा त्यामागील हेतू आपल्या आकलनापलीकडे असतो. आणि म्हणून अरविंदांच्या बंदीवासाविषयी आपल्या मनांत उठलेल्या प्रश्नांची उत्तरं आपल्याला जाणणं कठीण आहे. मात्र स्वत: श्रीअरविंदांनी बंदीवासातून सुटल्यावर उत्तरपारा येथे केलेल्या भाषणात ही उत्तरं मिळतात. आणि हा बंदिवास म्हणजे एक दैविक योजना होती याची जाणीव होते.

श्रीअरविंद म्हणतात 'मला जेव्हा अटक झाली तेव्हा मी प्रथम स्तंभित झालो. मातृभूमीला मुक्त करण्याचे पवित्र कार्य मी करत होतो. ते पूर्ण होईपर्यंत परमेश्वरी शक्ती माझे रक्षण करील अशी मला खात्री होती. मग असे का घडावे' श्रीअरविंदांच्या मनात हाच विचार सारखा घोळत होता. दोन तीन दिवसांनी त्यांना आदेश मिळाला 'स्वस्थ रहा आणि पहा'.

असेच काही दिवस चिंतनात निघून गेले आणि अचानक एक दिवस अरविंदांना आठवण झाली की अटक होण्याच्या एक महिन्यापूर्वी त्यांना असा आदेश मिळाला होता की त्यांनी आपल कार्य थांबवावं, एकांतवासात निघून जावं, आणि स्वत:च्या अंतरंगाचा वेध घ्यावा.

पुढे श्रीअरविंद म्हणतात, ''पण कार्यावरील माझ्या आत्यंतिक प्रेमामुळे त्या आदेशाचे पालन करण्यास मी दुर्बल ठरलो. तसेच माझ्या अंत:करणातील स्वाभिमानामुळे आपण हे कार्य सोडल्यास कार्याचे नुकसान होईल अशी भीती मला वाटली'' ही जाणीव झाल्यानंतर श्रीअरविंदाना परमेश्वरी शक्तीनं दर्शन दिलं व सांगितलं, जे बंधन तोडण्याचं सामर्थ्य तुला नव्हतं ते तोडण्याचं काम मी केलं कारण. तू जे कार्य करत आहेस, ते आता तू थांबवावं, अशी माझी इच्छा आहे. आता तुला दुसऱ्या कार्यासाठी तयार व्हावं लागेल'. यावरून स्पष्ट होतं की अलिपूरचा खटला हे अरविंदांच्या बंदिवासासाठी एक निमित्त होतं. परमेश्वरी शक्तीला त्यांच्या जीवनकार्याचा सांधा आता बदलायचा होता.

बंदिवासात श्रीअरविंदांची योगसाधना आणि गीता व उपनिषदाचा अभ्यास सुरु होता. शेवटी त्यांना सर्व चराचरांतील भगवंताचं दर्शन होऊ लागलं. पहारेकऱ्यांच्या जागी वासुदेव दिसू लागला. तुरुंगात शिक्षा भोगणाऱ्या गुन्हेगारांच्या दरोडेखोरांच्या अंतर्यामी असणाऱ्या भगवंताचं दर्शन होऊ लागलं. न्यायालयात खटला सुरु होण्याची

चिन्हं दिसू लागताच अरविंदांनी कागदावर काही मुद्यांचं टिपण करायला सुरुवात केली. पण भगवंतानं आदेश दिला 'निश्चिंत रहा, तुझ्या वकीलाला बुद्धी देण्याचं काम मी करतो आहे. या खटल्यातून तू मुक्त होशील'.

## अलिपूरचा खटला

अखेर बीचक्रॉफ्ट या न्यायाधीशाच्या समोर खटला उभा राहिला. हे बीचक्रॉफ्ट साहेब केंब्रिजला अरविंदाच्याच वर्गात होते. सरकारच्या वतीनं बॅ. नॉर्टन हे काम पहात होते. तर आरोपींच्या वतीनं देशबंधू चित्तरंजन दास काम पहात होते.

जवळ जवळ ७/८ महिने खटल्याचं काम चालू होतं. अरविंदांच्या बरोबर त्यांचा भाऊ बारिन, उल्हासकर दत्त आणि इतर ४० जण आरोपी होते. चित्तरंजन दास यांनी रात्रीचा दिवस करून खूप अभ्यास केला. मोठ्या चातुर्यानं आणि नेटानं ही केस लढवली. त्यांच अखेरचं युक्तिवादाचं भाषण ८ दिवस चाललं होतं. आपल्या प्रभावी भाषणाचा शेवट करताना अरविंदांचा गौरव करत ते म्हणाले - ' Long after this controversy will be in silence, long after this agitation will have ceased, long after he is dead, and gone, he will be looked upon as the poet of patriotism, as the prophet of nationalism and the lover of humanity. Long after he is dead, and gone his words will be echoed and reechoed not only in India but across distant seas & lands'.

ज्यूरींनी अरविंदांना दोषमुक्त केलं. बारिन व उल्हासकर यांना फाशीची शिक्षा तर इतरांना जन्मठेप झाली. पुढे चित्तरंजन दास यांनी अपील केलं. व अपिलात बारिन व उल्हासकर यांनाही जन्मठेपेची सजा सुनावण्यात आली.

अशा रीतिनं श्रीअरविंद बंदीवासातून मुक्त झाले. ते बाहेर आले तेव्हा नॅशनलिस्ट पार्टीचे बहुतेक नेते तुरुंगात होते. लढ्याचा जोर थोडासा कमी झाला होता. तुरुंगात जाण्यापूर्वीचे अरविंद आणि तुरुंगात वर्षभर राहून आलेले अरविंद यांत जमीन आस्मानाचा फरक होता. आपल्या कारावासाच्या फलश्रुतीचं वर्णन करताना ते म्हणाले की, इंग्रज सरकारनं माझ्यावर राग काढला पण मला परमेश्वराची प्राप्ती झाली.

यानंतर श्रीअरविंदांनी 'कर्मयोगिन' व 'धर्म' या नावाची दोन साप्ताहिकं सुरू केली. कर्मयोगिन मधून जसे उपनिषदांवर लेख आले तसेच राष्ट्रीय शिक्षणावरही आले. बाजीप्रभूवरील काव्यही प्रथम कर्मयोगिन मध्येच प्रसिद्ध झालं. 'धर्म' मधून तर सनातन धर्माच्या मूलभूत तत्त्वांवर लेख प्रसिद्ध होत होते. अशा तऱ्हेनं त्यांचं लिखाण आता अध्यात्माकडे अधिक झुकलं होतं. पण सरकारला अजूनही असं वाटत होतं की क्रान्तिकारकांना त्यांचं आतून मार्गदर्शन आहे. कर्झनसाहेबाच्या जागी आलेल्या लॉर्ड मिंटो साहेबानं मोर्लेसाहेबांना पाठवलेल्या खलित्यांत म्हटलं होतं, 'He is the most dangerous man we have to deal with and he has great influence with the student class' .

## ब्रिटिश पार्लमेंटमधील चर्चा

अशा तऱ्हेनं सरकारच्या मनात अरविंद काय करतील याबद्दल भीती होती. त्यांना पकडून भारतातून हद्दपार करण्याचे बेतही आखले जात होते. १९१० च्या ऑगस्टमध्ये या विषयाला ब्रिटिश संसदेत तोंड फुटलं. भावी काळांत इंग्लंडचे पंतप्रधान झालेले रॅम्से मॅक्डोनल्ड हे त्यावेळी विरोधी पक्षनेते होते. त्यांनी 'कर्मयोगिन' चा अंक पार्लमेंटमध्ये दाखवून यांत आक्षेपार्ह काय आहे असा सवाल केला. त्यानंतर मॅक्डोनल्ड साहेबांनी श्रीअरविंदांचं जीवन आणि राजकीय तत्त्वज्ञान याविषयी पार्लमेंटला माहिती दिली. मॅक्डोनल्ड साहेब पुढे म्हणाले- 'मी अलकडेच भारतात गेलो असता अरविंदांना भेटलो होतो. राजकारणाच्या रणधुमाळीत ते फार काळ राहतील असे वाटत नाही'.


हे सर्व विचार मांडले गेले, तरी सरकारचे मन बदलत नव्हते. असेच एक दिवस श्रीअरविंद कर्मयोगिनच्या कचेरीत बसले असता कोणीतरी गुप्त बातमी आणली की त्यांना आता कोणत्याही क्षणी अटक होऊ शकते.

अरविंद क्षणभर विचारमग्न झाले. आणि मग त्यांना अचानक आदेश मिळाला 'निघ आता इथून' क्षणाचाही विलंब न करता श्रीअरविंदांनी त्या आज्ञेचं पालन केलं. प्रथम ते चन्द्रनगरला गेले. तिथे काही दिवस राहून त्यांनी पुढे पॉंडिचेरीस प्रयाण केलं.

अरविंदांच्या राजकीय जीवनाची इथे समाप्ती झाली. स्वातंत्र्याचा लढा ते अर्धा सोडून गेले. काहींना दु:ख झालं, काहींना रागही आला. अनेकांना त्यांनी असं का करावं ते कळलंच नाही. शेवटी प्रत्येक घटनेचं मूल्यमापन आपण आपल्या पातळीवरुन, आपल्या दृष्टिकोनातून, आपल्या बुद्धीनं करत असतो. या सर्वांच्या पलीकडून ज्याची सूत्रं हालवली जातात त्या गोष्टी आपणाला कशा कळणार? आता श्रीअरविंदाना स्पष्ट दिसत होतं की भारत स्वतंत्र होणार आहे, पण ते काम आणखी कोणाला तरी करायचं आहे. आता साऱ्या मानवजातीला मुक्त करण्याचं महान कार्य त्यांना करायचं होतं. पृथ्वीतलावर भावी काळात निर्माण होणाऱ्या दैवी जीवनाकडे वाटचाल करण्यासाठी, साऱ्या मानवजातीला मार्गदर्शन करायचं होतं. त्या महान कार्याच्या सिद्धतेसाठी आता त्यांनी अगस्तिऋषीच्या तपश्चर्येनं पावन झालेल्या वेदपुरीकडे प्रयाण केलं होतं.

श्री. नरेन्द्र नाडकर्णी
सीडी. १०१, सी-१, श्रीरंग सोसायटी ठाणे.
दूरध्वनी क्रमांक : २५३३३१६०
email : nd_nadkarni@yahoo.com

•••



विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर, ही माझी प्रार्थना नाही.
विपत्तीमध्ये मी भयभीत होऊ नये, एवढीच माझी इच्छा.
दु:खतापानं व्यथित झालेल्या माझ्या मनाचे
तू सांत्वन करावंस अशी माझी अपेक्षा नाही,
दु:खावर जय मिळवता यावा एवढीच माझी इच्छा.
माझ्या मदतीला कोणी आलं नाही
तर माझं बळ मोडून पडू नये एवढीच माझी इच्छा.
जगात माझं नुकसान झालं,
केवळ फसवणूकच वाट्याला आली,
तर माझं मन खंबीर राहावं एवढीच माझी इच्छा.
माझं तारण तू करावंस,
मला तारावंस ही माझी प्रार्थना नाही.
तरुन जाण्याचं सामर्थ्य माझ्यात असावं
एवढीच माझी इच्छा.
माझं ओझं हलकं करुन
तू माझं सांत्वन केलं नाहीस तरी माझी तक्रार नाही
ते ओझं वाहायची शक्ती मात्र माझ्यात असावी
एवढीच माझी इच्छा.
सुखाच्या दिवसात नतमस्तक होऊन
मी तुझा चेहरा ओळखावा दु:खाच्या रात्री
सारं जग जेव्हा माझी फसवणूक करील
तेव्हा तुझ्याविषयी माझ्या मनात
शंका निर्माण होऊ नये
एवढीच माझी इच्छा

- गुरुदेव रवींद्रनाथ टागोर

# सूर्योपासना
## (लेखांक तिसरा)

*सूर्याची उपासना अत्यंत आरोग्यकारक आहे. सूर्यनामस्मरणांतील मंत्रांचे महत्त्व सर्वज्ञात आहे. याशिवाय उपासनेचे हे अन्य मार्ग .-* संपादक

**सूर्योपासना**

मानवी शरीरात दहा अवयव प्रमुख आहेत. त्यांना इंद्रिये म्हणतात. त्यापैकी पाच ज्ञानेंद्रिये व पाच कर्मेंद्रिय आहेत. या दहा इंद्रियांत गुणवत्ता, उपयोग, प्रभाव आणि व्यावहारिकता या भूमिकेतून पाहिल्यास डोळे हे सर्व श्रेष्ठ इंद्रिय मानले जातात. 'सर्वेन्द्रियाणां नयनं प्रधानम्', याला नेत्र, चक्षु, अक्षि, दृक्, लोचन अशी अनेक पर्यायी शब्द आहेत. डोळे नसल्यास सारा संसार अंधकारमय होतो. प्रत्येक वस्तू जीवजंतू, वनस्पती तसेच दृश्य तेव्हाच आपल्या जीवनात रंग भरतात ज्यावेळी, आपण आपल्या डोळ्यांनी पाहातो. जे काही डोळ्यांनी पाहिले जात नाही त्याचे अस्तित्व आहेसे वाटत नाही. यामुळेच अंधारात साऱ्या वस्तू लुप्त होतात. आणि त्या दृष्टी गोचर होत नाहीत.

दृष्टी आणि प्रकाश यांचा घनिष्ठ संबंध आहे. दृष्टीचे स्वास्थ्य आहे तोवर दृष्टी प्रकाशाचे ग्रहण करते. दृष्टीच्या स्वास्थ्यासाठी डोळ्यांचे स्वास्थ्य आवश्यक आहे. नेत्र पटलावरच सारे दृश्य जगत् चित्रित होत असते. त्यामुळे मन बुद्धी प्रभावित होतात. यासाठी डोळ्यांचे आरोग्य, त्यांची क्षमता, सतेजता ही आवश्यक आहे.

प्रकाशाचा सर्वात मोठा स्रोत सूर्य देव आहे. सूर्यच सर्व जगाला प्रकाशित करतो. प्रकाश मानवाला दृष्टी देतो. म्हणूनच नेत्र व प्रकाश यांचा घनिष्ट संबंध आहे. प्रकाशाची दृष्टीला अत्यंत आवश्यकता आहे. त्याची पण एक मर्यादा आहे. प्रकाश नेत्रांना हितकारी असेल, औचित्य व संगतीपूर्ण असेल, याच्यापेक्षा जास्त वा कमी प्रकाश नेत्रांना हितकारक ठरत नाही. नेत्र रोग पुष्कळदा अशा प्रकाशामुळे रंजित होतात.

रोग निवारण्यासाठी, आयुर्वेदात विविध औषधींचा उपयोग सांगितलेला आहे. सूर्य प्रकाशाने नेत्रांना दृष्टी प्राप्त होते. जर काही उपायाने सूर्य किरणे नेत्रांना अनुकूल करता आली तर नेत्ररोग दूर करण्यास मदत होईल. औषधी उपायाबरोबरच आध्यात्मिक उपाय म्हणून, सूर्योपासना केली तर विशेष लाभ होऊ शकेल. नेत्र रोग नष्ट करण्याचा उपाय म्हणून 'चाक्षुषी विद्या' असा एक ऋषी प्रणित ग्रंथ आहे. यात सर्वाधिक सूर्योपासना निर्दिष्ट केल्या आहेत. यात सूर्य प्रार्थना आहेत. जो कोणी स्नानानंतर शुद्ध व श्रद्धायुक्त अंतःकरणाने सूर्य पूजा व सूर्य स्तुती करील, त्याला नेत्र व्याधीपासून सुटका करून घेता येईल.

या उपासनेचा एक विधि सांगितलेला आहे. कोणत्याही एका रविवारी (रवि पुष्य योग असल्यास उत्तम) प्रातःकाळी पूर्वाभिमुख सूर्याकडे तोंड करून बसावे. डोळे बंद करावेत. मनोमन माझा नेत्ररोग नष्ट होत आहे याचे चिंतन करावे. मग सूर्य मंत्र जपावा; असे बारा रविवार करावे. मधे खंड पडू देऊ नये. पूजाविधि -सर्व प्रथम तांब्याच्या तांब्यात जलभरून घ्यावे. त्यात लाल कण्हेरी फूल घालावे. लाल चंदन गंध मिसळावा. या पाण्याने सूर्य स्तवनाच्या वेळी सूर्याला अर्घ्य द्यावे. तो मंत्र असा ॐ एहि सूर्यो सहस्रांशो तेजोराशि जगत्पते । अनुकम्पय मां भक्तं गृहणार्घ्यं दिवाकरः । अर्घ्य देऊन झाल्यावर धूप दीप

समर्पित करावे. मग ध्यान करावे.

ॐ तस्याः चाक्षुषी विद्यायाः अहिं र्बुध्न्य ऋषिः गायत्री छंदः सूर्योदेवता तत् प्रीत्यर्थे जपे विनियोगः । चक्षु स्तेजोमयं पुण्यं कन्दुकं बिभ्रतीं करैः।

रौप्य सिंहासनारूढां देवी चाक्षुष्मतीं भजे।

चाक्षुषी विद्येच्या संदर्भात वेगवेगळे पाठ आढळतात. (चाक्षुषी विद्या म्हणजे नेत्र रोगहारी स्तुती) त्यातील एक पाठ असा आहे.

ॐ चक्षुः चक्षुः चक्षुः तेजः स्थिरोभव । मां पाहि पाहि । त्वरितं चक्षुरोगान् शमय शमय । मम जात रुपं तेजो दर्शय दर्शय । यथा अहं अंध न स्यां तथा कल्पय कल्पय । कल्याणं कुरु कुरु । यानि मम पूर्व जन्मोपार्जितानि चक्षुः प्रतिरोधक दुष्कृतानि सर्वाणि निर्मूलय निर्मूलय । ॐ नमः चक्षुः तेजो दात्रे दिव्याय भास्कराय । ॐ नमः अरुणाकराय अमृताय । ॐ नमः सूर्याय । ॐ नमो भगवते सूर्याय अक्षि तेजसे नमः । खेचराय नमः । महते नमः । रजसे नमः । तमसे नमः । असतो मा सद् गमय । तमसो मां ज्योतर्गिमय । मृत्योर्मा अमृतं गमय । उष्णो भगवान् शुचिरुपः । हंसो भगवान शुचि प्रतिरूपः ।

नेत्ररोग नाशक गायत्री मंत्र. हा मंत्र गरूड गायत्री नावे प्रसिद्ध आहे. दैनंदिन जपाने नेत्ररोग कमी होण्यास मदत होते.

ॐ पक्षिराजाय विद्महे । सुवर्ण पक्षाय धमिहि ।

तन्नो गरुडः प्रचोदयात् ।

आरोग्यं भास्करात् इच्छेत् । मोक्षं इच्छेत् जनार्दनात् ।

असे आणखी अनेक मंत्र आहेत.

**चाक्षुषी बीज मंत्र -** ॐ ऱ्हीं हंसः ।

सूर्य यंत्रपण आहे. त्याचेही पूजन केले जाते.

सूर्य स्तुती -

प्रातः स्मरामि खलुतत् सवितुः वरेण्यं । रुपं हि मंडलम् चोऽथ तनुः मंजूषि ।

सामानि यस्य किरणाः प्रभवादि हेतुः । ब्रह्माहरात्मक मलक्षमचिन्त्य रुपम् ॥१॥

प्रातर्नमानि तरणिं तनुवाङ्मनोभिपि । ब्रह्मेन्द्र पूर्वक सुरैः नतमर्चितंच ।

वृष्टि प्रमोचन विनिग्रह हेतुभूतं । त्रैलोक्य पालन परं त्रिगुणाहमकंच ॥२॥

प्रातर्भजानि सवितार मनन्तशक्तिं । पापौघ शत्रुभयरोग हरं परंच ।

तं सर्व लोक कलनातत्म कालमूर्ति । गोकण्ठ बंधन विमोचन मादि देवम् ॥३॥

सूर्याष्टक पण उपलब्ध आहे. याच्या नियमित पठनाने सूर्याची कृपा प्राप्त होते. ते असे-

आदिदेव नमस्तुभ्यं प्रसीद मम भास्कर । दिवाकर नमस्तुभ्यं प्रभाकर नमोस्तुते ॥१॥

सप्ताश्व रथमारूढं प्रचण्ड कश्यपात्मजम् । श्वेत पद्मधरं देवं तं सूर्य प्रणमाम्यहम् ॥२॥

लोहितंरथमारुढं सर्वलोक पितामहं । महापापहरं देवं तं सूर्यं प्रणमाम्यहमं ॥३॥

त्रैगुण्यं च महाशूरं ब्रह्मा विष्णु महेश्वरं । महापाप हरं देवं तं सूर्य प्रमाण्यहम् ॥४॥

बृंहीतं तेडजः पुञ्जंच वायुं आकाशमेवच । प्रभुंच सर्व लोकांना तं सूर्य प्रणमाम्यहम् ॥५॥

बन्धूक पुष्प संकाशं हार कुण्डल भूषितम् । एक चक्रधरं देवं तं सूर्य प्रणमाम्यहम् ॥६॥

तं सूर्य जगत्कर्तारं महातेजः प्रदीपनम् । महापाप हरं देवं तं सूर्यं प्रणमाम्यहम् ॥७॥

तं सूर्यं जगतां नाथं ज्ञान विज्ञान मोक्षदं । महापाप हरं देवं तं सूर्यं प्रणमाम्यहम् ॥८॥

श्रद्धापूर्वक नित्य सूर्य स्तुती व अष्टक नियमितपणे म्हणावे व सूर्याची कृपा करून घ्यावी. काही मंडळी त्रिकाळ स्नान करून संध्या वंदनादी करतात, तेव्हा ते गायत्री देवीचा जप करतात. ती सुद्धा सूर्योपासनाच आहे. देवी गायत्री व सूर्य देवता यात अंतर नाही. तो अभिन्न आहेत.

### सूर्यासंबंधी ऋग्वेदातील मंत्र

आकृष्णेन रजसा वर्तमानो निवेशयन् अमृतं मृत्यूंच ।

हिरण्येन सविता रथेन देवो याति भुवनानि पश्यनट ।

विद्यमान असलेल्या काळ्या रज: कणांतून प्रविष्ट होऊन अंतरिक्ष व मृत्यू लोकात सविता देव आपल्या सोन्याच्या रथातून सर्वत्रभुवने प्रकाशत वाटचाल करीत आहे.

वरील ऋचेतून असे ध्यानात येते की रजःकणाना आपल्या किरणाने प्रकाशित करून त्याद्वारे सर्वत्र प्रकाश पसरवीत एक एक भूभाग प्रकाशित करत सूर्य मार्गक्रमणा करतो. म्हणजे ज्या भूभागावर सूर्य किरणे पडतात तो भूभाग प्रकाशित होतो. पृथ्वी आपल्या भोवती फिरत असल्याने, तिचा जितका भूभाग सूर्य किरणांच्या कक्षेत येतो तेवढाच भूभाग प्रकाशित होतो. त्यामुळे दिवस व रात्र या दोन्ही गोष्टी एकाच वेळी विविध भूभागांवर आढळतात. सूर्याच्या कक्षेत येणारा भूभाग प्रकाशित तर, सूर्याच्या कक्षेत न येणारा भूभाग अप्रकाशित. मात्र क्रमानुसार निरंतर ही घटना घडत राहाते.

### सूर्यांचा पौराणिक मंत्र -

जपा कुसुम संकाशं काश्यपेयं महद्युतिम् ।

तमोऽरिं सर्व पापघ्नं प्रणितोऽस्मि दिवाकरम् ॥

जास्वंदीच्या फुलासमान ज्याची वर्णकांती आहे, जो तेजस्वी आहे, असा कश्यप पुत्र, जो अंधःकाराचा नाश करतो, सर्व पापांचा नाश करतो अशा सूर्य देवाला मी नमस्कार करतो.

काही लोक सूर्याचा खडा वापरतात. सूर्यांचा खडा माणिक आहे. हा अतिशय मूल्यवान दुर्लभ असा रत्न, रत्नाचा खडा आहे. याच्यासारख्या लाल खड्याचाही म्हणून वापर केला जातो.

### सूर्य एक महान शिक्षक

संपूर्ण विश्वात जीवन व गतीचा महान प्रेरक, प्रकाश सर्वत्र फैलावून सत्याचे दर्शन घडविणारा, अचेतनात चैतन्य निर्माण करणारा, असा सूर्य वेदांचे ज्ञान प्रदान करणारा व कर्मयोग शिकवणारा आहे. याज्ञवल्क्यांनी सूर्य देवाकडून शुक्ल यजुर्वेदाचे ज्ञाना प्रापत केले. भगवान सूर्य व हनुमान यांचे गुरु शिष्याचे नाते होते. हनुमंताला भूक लागली. त्यांनी सूर्यावर झेप घेतली. त्यावेळी ग्रहण समय होता म्हणून राहू तेथे आला. हनुमानापुढे त्याचे काही चालेना. तो इंद्राकडे गेला तक्रार केली. तेव्हा इंद्राने हनुमानावर आपले वज्र टाकून त्याची हनुवटी फोडली. हे वायुदेवाला कळताच वायुदेवाने आपली गती रोखली. सर्वत्र हाहाकार माजला. सर्व देव वायूला शरण गेले. आणि हनुमानाला विविध वर देऊ केले. वायूला संतुष्ट केले. सूर्याने हनुमानाला विद्वान् बनविण्याचे आश्वासन दिले.

मार्तण्डः तु अब्रवीत् तत्र भगवान् तिमिरापहः । तेजो अस्य मदीयस्य ददामि शतिकांकलम् ।

यदाच शास्त्राणि अध्येतुं शक्तिरस्य भविष्यति ।

तदास्य शास्त्रं दास्यामि येन वाग्मी भविष्यति ।

त्यावेळी भगवान् सूर्यदेव म्हणाले, 'मी या बालकाला माझ्यातील शतांश तेजोभाग देईन. हा शास्त्र शिकण्याच्या वयात आला म्हणजे अध्ययनाची शक्ती प्राप्त होईल. त्यावेळी मी त्याला शास्त्राचे ज्ञान देईन जेणेकरून तो विद्वान होईल. तो बालक आहे. योग्य काळ येताच मी त्याला ज्ञानी करीन. ही एक रुपक कथा आहे. राहू-तमोगुणी, इंद्र-रजोगुणी, ज्ञान प्राप्त करण्यात काही अडचणी निर्माण होतात, त्यांना दूरच सारावे लागते. हनुमानाला भौतिक भूक लागली नव्हती; ज्ञानाची भूक लागली होती. सूर्यापासून योग्यवेळी हनुमानाला ज्ञान प्राप्त झाले.

असौ पुनर् व्याकरणन ग्रहीष्यन् सूर्योन्मुखः प्रष्टुमनाः कपीन्द्रः।

उद्यत् गिरेः अस्तगिरीं जगाम ग्रंथं महत् धारयन् प्रमेयः।

ससूत्र वृत्त्यर्थ पदं महार्थ ससंग्रहं सिद्धति वै कपीन्द्रः।

न ह्यस्य कश्चित् सदृशोऽस्ति शास्त्रे वैशारदे छंद गतो तथैव।

सर्वासु विद्यासु तपो विधाने प्रस्पर्धतेऽयं हि गुरुं सुराणाम्।

सूर्यदेवाकडून व्याकरणाचे ज्ञान मिळविले. त्यासाठी त्याला राहावे लागे. उदयाचला पासून ते अस्त गिरीपर्यंत त्याच्या समवेत प्रवास करत ग्रंथाचे अध्ययन करावे लागले. त्याने पद अर्थ वृत्ति यात नैपुण्य प्राप्त केले. त्याच्यासारखा दुसरा या शास्त्रात पंडित झाला नाही. वेदाचे पण अध्ययन केले. सर्व विद्यांत तो पारंगत झाला. इतकेच नव्हे देवांचा गुरू बृहस्पती याचा स्पर्धक बनला.

हा उल्लेख किष्किन्धा कांडात पाहावयास मिळतो. श्रीराम व लक्ष्मण सीतेचा शोध करीत दक्षिणेकडील पम्पा सरोवरापर्यंत आले. तेथून ते किष्किन्धाकडे निघाले. धनुर्धारी राजकुमार तेथून चालत असलेले पाहून ऋष्यमूक पर्वतावर निवास करणाऱ्या सुग्रीवाला शंका आली. हे वालीचे तर हस्तक नसतील. ते कोण आहेत याची शहानिशा करण्यासाठी सुग्रीवाने आपला सचिव हनुमंताला त्यांच्याकडे पाठविले. हनुमान एक ब्राह्मणाचा वेष करून त्यांच्यासमोर उभा ठाकला. कुशल इत्यादी झाल्यावर आपल्या येण्याचे कारण काय आहे हे सांगितले. त्यावेळी राम लक्ष्मणाला म्हणतो, 'नानृक् वेद विनीतस्य ना यजुर्वेद धारिणः । ना सामवेद विदुषः शक्यं एवं विभाषि तुम् । नूनं व्याकरणं कृत्स्नं अनेन बहुधा श्रुतम् । बहु व्यवहरता तेज न किंचित् अपशब्दितम् ।

लक्ष्मणा खरोखर ज्याने ऋक,यजु व साम वेद यांचा अभ्यास केला नाही त्याला इतके चांगले बोलताच येणार नाही, खरोखरच याला व्याकरणही अवगत असावे. कारण इतका वेळ तो बोलला परंतु त्याच्या भाषणात एकही शब्द चुकीचा नव्हता.

वृध्द कौशिक ऋषींनी हनुमंताचे वर्णन करताना 'बुद्धिमतां वरिष्टम्'असे केले आहे. ते किती सार्थ आहे याचा प्रत्यय श्रीरामालादेखील आला होता.

सूर्याच्या आज्ञेमुळे (गुरु आज्ञेमुळे) हनुमंताने सुग्रीवाची जन्मभर सेवा केली. सुग्रीवाचा सचिव म्हणून राहून त्याने आपल्या गुरूची आज्ञा पाळली.

सूर्याज्ञया तदंशस्य सुग्रीवा स्यान्तिकं ययौ । मातुराज्ञां अनुप्राप्य रुद्रांशः कपिसत्तमः ।

(क्रमशः)

**शं. वा. मठ**

६, कुमार आशिष
राम मारुती रोड, ठाणे
४०० ६०२.

•••

# ओळख काही प्रतीकांची

*भारतीय संस्कृतीत प्रतीकांना खूप महत्त्व आहे. मांगल्य, पावित्र्याचा संकल्पनांशी संबंधित काही प्रतीकांची ही माहिती श्रावण ह्या धार्मिक महिन्यानिमित्त देत आहोत- संपादक*

प्रस्तावना :-

सृष्टीतील सर्व घडामोडी या कोणत्याही अज्ञात शक्तीद्वारे नियंत्रित केल्या जातात, ही संकल्पना फार प्राचीन काळापासून मानवाने मान्य केलेली आहे. या शक्तीला प्रसन्न करुन घेण्यासाठी शुभ प्रतीकांचं पूजन जगभरच करण्यात आलेलं आहे. ही शक्ती मंगलमय असून अमंगल असुर शक्तींचा नाश करणारी आहे. मानवाच्या सुखदु:खाशी या शक्तीचे नाते जोडलेले आहे. ज्या गोष्टी या शक्तीला आवडतात, त्यांना धारण करण्याचा किंवा सहवासात ठेवण्याचा मानवाने प्रयत्न केला आहे. त्यांनाच पुढे प्रतिक असे संबोधण्यात येऊ लागले.

गूढ कल्पना, महान आशय, थोर परंपरा किंवा चिरंतन तत्त्वविचार सूचित करणाऱ्या दृश्य वस्तूंनासुध्दा प्रतीके म्हणतात. आईकडून मुलाचे, बहिणीकडून भावाचे किंवा पत्नीकडून पतीचे केले जाणारे औक्षण हे सुद्धा दीर्घायुष्य व मांगल्य यांचे प्रतीकच आहे.

आपल्या नित्य आचरणात, दैनंदिन पूजापाठ किंवा मंगलप्रसंगी आपण अनेक प्रतीकांचा वापर करीत असतो. त्यातील काही पूज्य प्रतीकांची ओळख.

१. अक्षता

पिंजर किंवा केशर टाकून रंगवलेल्या अक्षत (अखंड) तांदुळांना अक्षता म्हणतात. आवाहन करण्यासाठी किंवा आवतण देण्यासाठी यांचा वापर करतात. पूजेत अक्षतांचा मुबलक वापर असतो. एखादे पूजासाहित्य कमी पडल्यास त्याजागी अक्षतांद्वारे भर केली जाते. अक्षतांस सुगीचे प्रतीक मानतात. लग्नात 'कुर्यात् सदा मंगलम' अशा शुभेच्छा देताना वधुवरांवर अक्षताच उधळल्या जातात. ब्राह्मण आशीर्वादाचे मंत्र म्हणून यजमानांना मंत्राक्षता देतात. अक्षता या बल, समृद्धी व दीर्घायुष्य देणाऱ्या मानण्यात येतात.

२. कमळ

कमळास पिंडब्रह्मांडात शोभा, वैभव, आरोग्य व कीर्तीचे प्रतीक वर्णिले आहे. कमळाला सांस्कृतिकदृष्ट्या खूप महत्त्व आहे. विविध धर्मांतून कमळ हे संपन्नतेचे प्रतीक मानण्यात आले आहे. वायुपुराणात पृथ्वीचा आकार कमळासारखा असल्याचे सांगितले आहे. राजाच्या बाहूवर जर कमळाचे चित्र असेल तर तो चक्रवर्ती होतो, असे सामुद्रिकशास्त्रात लिहिले आहे. कमळ हे शुभदायक आहे. ब्रह्माचे उत्पत्तिस्थान आहे. कमळास लक्ष्मीचेच रुप मानतात. भारताचे राष्ट्रीय फूल कमळ आहे.

३. कलश

कलश म्हणजे गोलाकार उभट पात्र. समुद्रमंथनाच्यावेळी अमृत धारण करण्यासाठी विश्वकर्म्याने याची निर्मिती केली, अशी नोंद कालिका पुराणात आहे. विवाहादी मंगलकार्यात शांतिकर्मात सर्वप्रथम कलश स्थापना करतात. कलश हे आध्यात्मिक प्रतीक आहे. कलश म्हणजे मानवी शरीर व जल म्हणजे त्यातले जीवनतत्त्व होय. कलशाच्या मुखावर ठेवलेले पुष्पपल्लव हे जीवनसमृद्धीचे, दूर्वा जीवसृष्टीचे व पंचरत्ने ही पंचविषयांची प्रतीके होत. शरीर चैतन्याने परिपूर्ण असते, तोवरच ते

दर्शनीय असते. चैतन्य लुप्त झाले की ते अमंगल होते. रिकामा घडा म्हणजे निष्फळ खापर.

### ४. दीप

जो स्वत: प्रकाशतो व दुसऱ्यास प्रकाश देतो, तो दीप होय. दीप हे अग्नी व तेजाचे प्रतीक आहे. तसेच ते बुद्धीचे व ज्ञानाचेही प्रतीक आहे. दीपाला प्रकाशाचे साधन म्हणून व्यवहारात महत्त्व आहे. विष्णूच्या समोर दीप लावल्यास तुलादानाचे व तीर्थात स्नान केल्याचे पुण्य लाभते. नरकचतुर्दशीला दीपदान केल्यास नरकवास भोगावा लागत नाही. दीपाची विविध रुपे आहेत. दिवाळीच्या वेळी आकाशात लटकणाऱ्या दिव्यास आकाशदिवा म्हणतात. लग्नकार्यात एक लामण दिवा ठेवतात, त्याला शकुनदिवा असे नाव आहे. मंगळागौरींच्या पूजेत कणकेचे दिवे ठेवतात, ते पिष्टदीप म्हणून ओळखले जातात. कोणत्याही मंगलविधीत साक्षी म्हणून एक दिवा तेवत ठेवतात, त्याला स्थापितदीप असे म्हणतात. अष्टौप्रहर तेवत राहणाऱ्या दिव्यास नंदादीप म्हणून ओळखले जाते. हे सर्वांना माहीत आहेच.

### ५. रुद्राक्ष

रुद्राक्ष हा शब्द रुद्र+अक्ष यापासून बनला आहे. शिवाचा नेत्र असा त्याचा अर्थ होतो. या नेत्राला जगाच्या आध्यात्मिक तेजोबलाचे प्रतीक मानतात. देवी भागवतानुसार आवळ्याच्या आकाराचे रुद्राक्ष सर्वश्रेष्ठ, बोराच्या आकाराचे मध्यम व चण्याच्या आकाराचे कनिष्ठ दर्जाचे मानले जाते. याच्या मध्याला रेषात्मक भाग असतो. त्यांना मुख असे म्हणतात. अशी एक ते चौदा मुखे असू शकतात. रुद्राक्ष पांढरा, तांबडा, पिवळा व काळा या चार रंगात मिळतात. पांढरा सर्वश्रेष्ठ तर काळा सर्वात हीन समजला जातो. मंत्रजपासाठी १०८ रुद्राक्षांची माळ घेतली जाते. रुद्राक्षांमुळे प्राणतत्त्व नियमित राहते, असे आयुर्वेदात सांगितले आहे.

### ६. रांगोळी

कुठल्याही धार्मिक किंवा मंगल कार्यात रांगोळी ही आवश्यक गोष्ट मानली जाते. सौंदर्याचा साक्षात्कार व मंगलाची सिद्धी हे रांगोळीचे उद्देश आहेत. त्यातील प्रत्येक आकृती हे एक प्रतीक असते. रांगोळी ही अशुभ निवारक व शुभप्रद मानली गेली आहे. जमिनीवर केरसुणी फिरवताना किंवा सारवताना जी सूक्ष्म रेषांची कंपने उद्भवतात, ती मानवास शारीरिक अस्वास्थ्य व मानसिक दौर्बल्य यास कारणीभूत होतात. त्याचे निवारण रांगोळीद्वारे केले जाते.

### ७. शंख

शंख हे विष्णुच्या हातातील एक आयुध व देवपूजेतील एक महत्त्वाचे उपकरण आहे. शंख हे शुद्धतेचं प्रतीक आहे. शंखोदक फुला ने आपल्या अंगावर व पूजासाहित्यावर शिंपडतात. सर्व देवांना शंखोदक प्रिय आहे. मात्र शिव व सूर्य यांच्या अभिषेकास शंखोदक चालत नाही. भारतीय शिल्पशास्त्रानुसार शंखाचा प्राणीज रत्नात समावेश होतो. शंख समुद्रात सापडतात. त्यांचे वामावर्त व दक्षिणावर्त असे दोन प्रकार पडतात. त्याच्या अंगावर असणाऱ्या पिळांवरुन हे प्रकार ठरविले जातात.

### ८. स्वस्तिक

स्वस्तिक हा शब्द सु+अस् या धातुपासून बनला आहे. सु म्हणजे शुभ व अस् म्हणजे अस्तित्व. म्हणजेच स्वस्तिक याचा अर्थ कल्याणाचे अस्तित्व. म्हणूनच प्राचीन काळापासून भारतीयानी सर्वश्रेष्ठ प्रतीक म्हणून याचा जीवनाच्या अनेक अंगात प्रयोग केला आहे. एक उभी रेषा व तिच्यावर तेव्हढ्याच लांबीची दुसरी रेषा अशी याची मुळातली आकृती होती. उभी रेषा म्हणजे ज्योतिर्लिंग व आडवी रेषा म्हणजे सृष्टीचा विस्तार होय.

स्वस्तिकाचा अनेक देवतांशी संबंध जोडला गेला आहे. त्याच्या फुलीभोवती वर्तुळ काढले की ते सूर्याचे

प्रतीक बनते. उभ्या फुलीत तिरपी फुली काढली की अष्टदिशांचे आठ आरे तयार होतात. त्यांना त्रिकोणी आकार दिला की कमळ तयार होते. स्वस्तिकाच्या चार भुजा म्हणजे विष्णूचे नाभिकमल होय. ते ब्रह्मदेवाचे जन्मस्थान. त्यामुळे स्वस्तिकाचे सर्जनात्मक रूप सूचित होते. फुलीच्या आडव्या रेषेची दोन्ही अग्रे उभी वळवली की त्याचा त्रिशूळ बनतो. हे शिवप्रतीक संहारस्वरूप आहे. अशा रितीने उत्पत्ती(सृष्टी), स्थिती व लय अशा विश्वाच्या तिन्ही अवस्था एकाच प्रतीकात सामावलेल्या आढळतात. स्वस्तिकाचे डावे व उजवे असे दोन प्रकार आहेत. डाव्या प्रकारच्या स्वस्तिकाची अग्रे डावीकडे वळवली जातात, ते नारीतत्त्व व उजव्या प्रकारच्या स्वस्तिकाची अग्रे उजवीकडे वळवली जातात, ते नरतत्त्व. डावे स्वस्तिक कालीचे तर उजवे स्वस्तिक गणेशरूप मानतात. महाराष्ट्रात डावे स्वस्तिक रूढ असून ते प्रदक्षिणामार्गाला धरून आहे. सुवासिनी स्वस्तिकव्रत धरतात. प्रियजनांचा वियोग नष्ट व्हावा म्हणून स्वस्तिकपूजा केली जाते. अर्भकाला दृष्ट लागू नये म्हणून स्वस्तिकाच्या वस्त्रावर झोपवतात. लग्नात आंतरपाटावर स्वस्तिक रेखलेले असते.

**सारांश-**

प्रतीकांमध्ये प्रत्यक्ष देवतांचा वास कल्पिलेला असतो. म्हणून प्रत्यक्ष देवतांइतकीच प्रतीकपूजाही पूज्य मानली गेली आहे. प्रतीके देवांची व मंगलतेची नित्य आठवण करून देतात. त्यामुळे मानवाला सुख, शांती व समाधान लाभते, असे अनन्य साधारण महत्त्व आहे.

**संदर्भ :-**


१) अभ्यंकर, शंकर वासुदेव (संपा.), भक्तिकोश, खं. ४ (भारतीय उपासना), पुणे : आदित्य, २००३, पृ. १००६

२) जोशी, महादेवशास्त्री (संपा.) भारतीय संस्कृतिकोश, आ. ३, खं. १-१०, पुणे : भारतीय संस्कृतिकोश मंडळ, २००३



**प्रा. श्रीनिवास मेघःश्याम आठल्ये**

ग्रंथपाल, स्वामी विवेकानंद रात्र विद्यालय, दत्त नगर, आयरे मार्ग, डोंबिवली (पूर्व, ४२१ २०१.)


•••

## चिंतन

संस्था ही कोणतीही असो सहकारी, सरकारी खाजगी वा धर्मार्थ संस्थेत ठराविक तास काम करणे हा झाला कायदा.

पण कामात झोकून देणे ही झाली नैतिकता मी पगार घेतो म्हणून काम करतो ही झाली आपुलकी, संस्थेच्या अस्तित्वाची सुरक्षिततेची प्रतिष्ठेची वाजवी काळजी घेण्याचे दायित्व मला पार पाडावयाचे आहे ही आहे भावना.

संस्थेचे अस्तित्व आहे तेच माझे अस्तित्व आहे, माझी प्रतिष्ठा आहे.

म्हणून संस्थेला अहितकारक ठरेल अशी कृती मी करणार नाही, ही झाली निष्ठा.

सामाजिक ऋण फेडण्याच्या भावनेत कामात स्वःताला झोकून देईन ही सर्वांचीच भावना असली पाहिजे.

यातच संस्थेचा व स्वःताचा उद्धार आहे आणि हेच आपले शिक्षण कार्य आहे.


संकलन

**चंद्रकांत शिंगाडे**

विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन , ठाणे

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*मूर्ती, प्रतिमा प्रतीके यांचा मानवी संस्कृतीवर खोलवर परिणाम झाला आहे. त्यामागील सामाजिक मानसिकता व त्या अनुषंगाने केलेले हे चिंतन. - संपादक*

भारतीय संस्कृतीची, प्रत्येक पिढीतील जीवांमध्ये, तिच्या बीज, मॉडेल व साधनांमार्फत, संक्रमण व जन्मजात बीजाला अनुसरुन विशिष्ट मूल्यांची वृद्धी करण्याची योजना, आपण दिशाच्या मागील अनेक अंकांमध्ये मांडत आलो आहोत.

मागच्या अंकात ह्या साधनेसाठी प्रतीके, प्रतिमा किंवा 'Symbol' व 'Gestalt' ह्या दोन संकल्पनांचा उपयोग कसा केला गेला, हेही पाहिले. कोणी असे म्हणेल की 'तुम्ही तर 'Gestalt' ह्या जर्मन संकल्पनेचा उपयोग या युक्ती, 'भारतीय' असे म्हणून सांगता हे कसे काय?

त्याकरितां मानवी फॉर्मच्या बाहेर ज्या जड वस्तू, चित्रे, प्रतीमा आहेत, त्यांना 'Symbol' हे तत्त्व कसे लागू पडते हे पहावे लागेल. त्यानंतर ह्या प्रतीकाला वापरुन मानवी मनांत, अंत:करणात, मेंदूत किंवा सरतेशेवटी Consiousness मध्ये कसे व कां बदल होतात हे पहावे लागेल. पाश्चात्य संस्कृतीतही अगदी भौतिक स्तरावर सुद्धा विचार चालू आहे.

ह्यावर डॉ. एम् कोलाव्हिटो हे काय सांगतात हे बघू या. He says, " The Bio-Cultural paradigms shows that biology and culture act on one another as the conditioning parameters of Neuro-cultural in-formation. Through mutual interaction biology in humans becomes culture, and vice versa, culture opens and stimulates the neural passages of the brains ........"

ते म्हणतात, ''जीव-संस्कृती पॅराडिम असे दाखवितो की, जीवशास्त्र व संस्कृती ही परस्परांवर संस्कार करत असतात व एकमेकांना संलग्न, संबद्ध व संयमित करत असतात. ह्या संस्कारांच्या प्रक्रियेला मानसिक, सांस्कृतिक ज्ञानतंतूच्या क्रिया म्हणावयाला हवे. ह्या परस्पर संबंधित क्रियांमधून जीवांवर संस्कृती स्थापली जाते आणि तशीच उलट, क्रिया होते. आणि, संस्कृती मानवाच्या सूक्ष्म मेंदूतंतूना उत्तेजित करण्यात यशस्वी होते.

आतां कळीचा मुद्दा हा आहे की ह्या क्रिया वस्तुत: निसर्गाकडून जवळजवळ यंत्रवत किंवा नैसर्गिकपणे Organically होतात. हा 'निसर्ग नियम' आहे व तो मानवी फॉर्म व विश्वरचनेचा एक अविभाज्य, चिरंतन भाग आहे. आपण असे म्हणू या कीं डॉ. कोलाव्हिटो यांना याचा सुगावा लागला व खात्री पटली.

पण, ज्या ऋषी व योग्यांनी भारतीय संस्कृतीमध्ये अनेक 'कर्मकांडे' (वेद, उपनिषद, ब्राह्मणे) यामधून ही गुह्ये शोधून प्रसारित करण्याचा उद्योग केला, त्यांना ह्या नैसर्गिक तत्त्वांचाच आधार होता व त्याचा त्यांनी जाणीवपूर्वक सर्रास वापर केला. तोही जगांतील गुह्य संबंधावर आधारलेला ज्ञानाचा व विद्यांच्या प्रसारासाठी आणि 'आत्म्याच्या' उद्धारासाठी!!

### कर्मकांड, सरस्वती व उध्वरेत गणपती

एव्हढे मात्र मान्य किंवा कबूल लागेल की आजच्या दिवसाला ह्या 'कर्मकांडातील रचनेतील' गुह्य क्रिया घडतात व त्या घडविण्याचे ज्ञान, मात्र लुप्त झाले आहे. अगदी 'सरस्वती नदी सारखे!! इडा, पिंगला व सुषुम्ना ह्या

तीन नद्यांचा जो 'प्रयाग' संगम आज्ञा चक्रापाशी होतो, त्या सुषुम्ना नाडींतील 'कुंडलिनी' जागृतीनंतर होणाऱ्या 'उर्ध्वरेत' प्रयोगाचे ज्ञान आज विरळे झाले आहे. पण, तुम्हाला माहीत नसेल तर सांगतो. डॉ. बेडकर व श्री. विनय सहस्त्रबुद्धे हे अफगाणिस्तानात गेले होते, तिथे त्यांना 'उर्ध्वरेत गणपतींची मूर्ती पहावयाला मिळाली व तिचे फोटोही काढले आहेत. नाथपंथी संत ज्ञानेश्वर आपल्या ज्ञानेश्वरी ग्रंथात ६ व्या अध्यायात ह्या शास्त्राचा मार्ग सांगतात आहेतच.


तेव्हां, या विषयावर नंतर पुन्हा एकदा विस्तृत लिहू 'वेदकालीन शिक्षणपद्धतीत' हे ज्ञान पुढील नवीन पिढीला कुठल्या प्रत्यक्षीकरणांने देत होते, ते उपक्रम आज ज्ञात नाहीत किंवा लुप्त झाले आहेत. पण, ज्ञानाची जी साधने 'भौतिक प्रगतीमध्ये' उपलब्ध होत आहेत व ज्या पाश्चात्य संस्कृतीने आताच्या तरुण पिढीचा ताबा घेतला आहे, त्यामध्ये कांही साधने मिळतात का व त्यांचा युक्तीने उपयोग करतां येईल का हे पहाणे अयोग्य ठरणार नाही.

### कॉलेज कॅंपस व चित्रपट सोसायटी मंडळ

जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे येथे नुकतीच म्हणजे गुरुवार दि. १२ जुलै २००७ ला 'चित्रपट मंडळाची स्थापना झाली. त्याचे उद्घाटन माननीय किरण शांताराम व माननीय श्याम बेनेगल ह्या चित्रपट सृष्टीतील दिग्गज व्यक्ती हजर होत्या. तेव्हा श्याम बेनेगल म्हणाले की, चित्रपट हे केवळ करमणूक व माहिती एव्हढ्या उद्दिष्टापुरतेच सीमित नाही. शिक्षण व तेही 'Audio-visual' ह्या प्रभावी माध्यमातून घडवण्याची क्षमता असलेले ते एक मोठे साधन आहे.

### सिनेमा व अध्यात्म

मला मग ह्या 'प्रभावी साधनाचा' उपयोग आध्यात्मिक ज्ञानासाठी होऊ शकेल का ह्याचा शोध घेणे आवश्यक वाटले. योगायोग असा की 'स्टार फिल्म' ह्या चॅनेल वर 'The Lost Room' ही तीन भागांची सिरीयल तीन दिवस दाखविली गेली. मला हा चित्रपट 'स्पिरीच्यूअल संकल्पना' Neuro-Cultural-Stimulus; संस्कारक्षम, अश्या सामर्थ्यांच्या वाटल्या. त्यावरची अमेरिका व जगभरच्या टीकाकारांनी घेतलेली दखल पाहून मला असे वाटले की आपल्या देशातील तरुण पिढीला विश्वासात घेऊन त्यांना या चित्रपटात काय पहावे व कसे पहावे हे सांगितल्यास ह्या नवीन माध्यमाचा स्पिरीच्यूअल शिक्षणासाठी व भारतीय संस्कृतीतील आध्यात्मिक ज्ञानाच्या प्रसारासाठी एका प्राथमिक उपयोग होऊ शकेल. जीवन मूल्ये मात्र भारतीय संस्कृतीवर आधारलेली असावी लागतील. त्यांना, अनुकुल असे




चित्र नं १ Slip No 1

| | | |
|---|---|---|
| TITLE | : | Lost Room, The |
| DATE | : | (2006, USA, 360 mins) |
| GOOD | : | YesYES |
| FIND | : | common |
| GENRE | : | Drama, FAntasy / Sci-Fi |
| THEME | : | AFterlife, Altered States; Journeying, Powers of Spirit, Reality, Relationships, Synchronicities |


चित्रपट निर्माण करावे लागतील!!

'द लॉस्ट रूम' (हरवलेली खोली) ह्या Sci-Fi म्हणजे सायन्स फिक्शन (विज्ञान गोष्ट) ह्यावर चर्चा करण्यासाठी आपण एक प्लॅन करु या. प्रथम ही गोष्ट एखादा ७/८ वर्षाचा मुलगा किंवा मुलगी कशी पाहते तसे सरळ पद्धतीने बघू यां. त्यानंतर त्यांत योजलेल्या चमत्कारिक, जादूच्या गोष्टींबद्दल बोलू या. त्यानंतर आपण आपल्याच जीवनांत ज्या काही जन्म मरणाच्या संकल्पना, प्रेम, दु:ख अभिलाषा ह्या पाहिल्या अनुभवल्या त्यातील पुन:प्रत्ययकारी अनुभव असा, ह्या चित्रपटांत, काय दिला जातो ते पाहुया. नंतर आपण आपल्या तत्त्वज्ञान, धर्म, श्रद्धा जीवनमूल्ये ह्या संकल्पनावर ह्या चित्रपटातील प्रसंगांची छाननी करुन, ह्या सर्वांचा प्रत्यक्ष चित्र, आवाज, 'भावना प्रत्यय' यांचा खेळ आपल्या कॉशसनेसला कितपत भावतो आणि परिणाम करतो ते पाहू या. पण हे तुम्ही पहाणे व चिंतन करणे आवश्यक आहे.

थोडक्यात, कुठलेही चित्रपट पहाताना ह्या किंवा कित्येक इतर संकल्पना असलेली ही मानसिक बैठक घेऊनच आपण चित्रपट पहातो ना? म्हणजेच पडद्यावरील हालचाल करणाऱ्या 'इमेजेस' 'Making Images' आपल्या मनाशी, अंत:करणाशी व कॉशसनेसशी एकतऱ्हेचा खेळ करत असतात नाही कां? आणि, त्या इमेजिस व आपली जीवन व संस्कार मूल्ये ह्यांचा परस्पर संवाद किंवा झगडाही चालू असतो. काही वेळां चित्रपट आपल्याला काही नवीन संकल्पना मधून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे 'Wolk in of through' प्रत्यय देत असतो व आपल्या अनुभूतींच्या खजिन्यांत भरही घालत असतो. कधी कधी तर त्या चित्रपटाची चालती बोलती जीवनमूल्ये तुम्हाला त्रासदायक किंवा आल्हाददायक सुद्धा वाटतात. तर, कधी कधी नवनवीन उंचीवर नेऊन ठेवत असतात. हेच खेळ 'Illusions' हे पुस्तक वाचतानाही घडत असतात. पुस्तक किंवा चित्रपट ह्यांतील चलचित्रे धावत असतात आणि आपले मनही त्याबरोबर ओढले जात असते. कधी पुढे जाते कधी मागेही पडते व कधी कधी पूर्ण हातही टेकते. ही झाली ह्या प्रवासाची थोडीशी झलक!!

हरवलेली खोलीची गोष्ट

मग आता निव्वळ गोष्ट काय आहे ते प्रथम बघू!!



चित्र नं. २

सनशाईन मोटेल

The Rorschanch inkblot test (pronounced IPA: is a method of psychological evaluation. Psychologists use this test to try to examine the personality characteristics and emotional functioning of their patients. The Rorschach is currently the second most commonly used test in forensic assessment, after the MMPI, and is the second most widely used test by members of the Society for Personality Assessment. It has been employed in diagnosing underlying thought disorder and differentiating psychotic from nonpsychotic thinking in cases where the patient is reluctant to openly admit to psychotic thinking.

४ मे १९६१ रोजी 'सनशाईन मोटेल', रस्ता नं ६६, गॅलपजवळ न्यू मेक्सीको येथील रुम नं. १० इथे मोठा उल्कापात म्हणजे वैश्विक उलाढाल झाली. नकी काय झाले हे कोणालाच सांगता येत नाही. पण, ही रुम नं.१०

''वैश्विक सामान्य अस्तित्वातून 'सत्यस्थितीतून' (Reality) गायब झाली. तुमच्या सर्व सामान्य भाषेत 'हरवली'. इतिहासातून पुसली गेली!!

ह्या मोटेलच्या मालकांना मात्र एक '१० नंबरच्या त्या रूमची' चावी सापडली. पण, काय वैशिष्ट्य, की ह्या किल्ली वा चावीने ह्या परलोकांत किंवा कुठल्यातरी विश्वातील (सत्य)लोकांत हरवलेल्या ह्या रूममध्ये प्रवेश मिळतो किंवा मिळू शकतो? शिवाय, ह्या रूमला जे इतर अनेक दरवाजे आहेत त्या कुठल्यातरी दरवाजातून कुठल्या तरी अव्यक्त जगातील, पण ह्या प्लॅनेटवरील, प्रदेशांत प्रवेश किंवा Exit मिळू शकतो. थोडक्यात ''Reality Transfer'' ''सत्य अस्तित्वात मौलिक बदल''!! (मृत्यू व जन्म ह्याच क्रिया करत असतो. 'जो मिलर' हा एक फेडरल डिटेक्टिव्ह आहे. तो एका जुन्या पुराण्या (Pawn Shop) वस्तूंच्या दुकानांत झालेल्या जगावेगळ्या अतर्क्य पद्धतीच्या खूनाचा तलास करत असताना, त्याला ह्या चमत्कारिक रूम व किल्लीची हकीगत समजते.

पुढे असे उघडकीस येते की ह्या १० नंबरच्या रूममधील १०० च्या वर लहान मोठ्या वस्तू ह्या चिरंतन अस्तित्व प्राप्त असलेल्या, नाशिवंत नसणाऱ्या अश्या असून, त्या जगभर विस्कळीतपणे विखुरलेल्या अवस्थेत फेकल्या गेल्या आहेत. शिवाय त्यातील प्रत्येक वस्तू एखाद्या मंतरलेल्या जादूसारख्या अंमलाखाली अतर्क्य पद्धतीने, अस्तित्वाच्या सत्यतेवर परिणाम करू शकते. काही वस्तू अगदी सामान्य शक्तीच्या म्हणजे एक पेन्सिल ही तिच्या डोक्यावर अंगठा दाबला की ११६१ सालची पेनी (नाणे) टपकून खाली टाकते. पण, इतर वस्तू काही भयानक ताकतींच्या ही आहेत. उदाहरणार्थ एक पेन की जे त्याच्या टोपणावर अंगठ्याने दाबल्यावर, मायक्रोरेडियेशन स्फोट होऊन त्या 'पॉन शॉप' मधील कामगारांच्या व इसमांच्या प्रत्यक्ष मृत्यूला कारणीभूत झाले!! ह्या भीषण प्रसंगाचे कारण ही हेच होते की ती गूढ किल्ली, ज्यावेळी दोन मिलीयन डॉलर्सना विकली जात होती. तेव्हांच हा गुन्हा व खून घडला.



चित्र नं.३ - जो मिलर व जेनिफर ब्लूम

'जो मिलर', डिटेक्टिव्ह हा ह्या गुन्ह्याचा तलास करीत असतो, एका याच प्रसंगांत जिवंत राहिलेल्या एका व्यक्तीकडून ही किल्ली ताब्यात घेतो. पण, ह्या वस्तूंचे एकमेकांत तीव्र आकर्षण असते. म्हणूनच 'जो' हा 'वॅली' नावाच्या गृहस्थाकडे ओढला जातो. ह्या वॅलीकडे एक बस टिकेट आहे. त्याच्या योगे हे वॅली ज्याला तिकीट डोळ्यासमोर फडफडवित दाखवितो तो इसम 'टेलीपोर्ट' होऊन त्या मूळ मोटेल व त्याच्या नऊ खोल्या ह्या वास्तूच्या समोरच्या पटांगणात व त्या वैराण प्रदेशांत फेकला जातो.

हा वॅली डिटेक्टिव्ह 'जो' ला सांगतो की संभाळून वाग. ह्या विखुरलेल्या वस्तूंच्या मागे काही क्रूर, सांप्रदायिक व पछाडलेले लोक लागले आहेत. त्यांचा असा समज आहे की, ह्या वस्तू एका मृत गॉड (देव) च्या आहेत. (डॉ. श्रीराम लागू नाही का आपल्याकडे ईश्वराला रिटायर' हो म्हणून उपदेश करीत आहेत), आणि जर ह्या सगळ्या वस्तू एकत्र जमविल्या तर ह्या ईश्वराशी बोलता येईल किंवा स्वत:ला ईश्वर बनता येईल. (आचार्य रजनीश नाही का 'भगवान' झाले)

'जो' जेव्हा घरी परततो तेव्हा त्याला धक्का बसतो कारण 'The Weasel' मॅटियू, एक निवृत्त प्रोफेसर 'जो'

ज्या आवडत्या एकुलत्या एक 'ॲना' नावाच्या लहान मुलीला पळवून नेण्यात व तिचे अपहरण करण्यात यशस्वी होतो. तो ह्या वस्तूंचा संग्रह करण्यात गुंतलेला असतो. त्याच्याकडे अगोदरच ते विचित्र पेन असते व त्याला ही 'जो' कडची किल्ली' हवी असते.

पण, ह्या किल्लीच्या सौदा किंवा 'डील' प्रकरणात गडबड होते आणि ही मुलगी ॲना ही रूम नं. १० मध्ये अभावितपणे शिरते, किल्ली बाहेरच रहाते, पण ती स्वत: नाहीशी होते.



चित्र नं. ४

रूम नं. १० आतील दृश्य

ह्या धुमचक्रीत ही रूम पुन्हा 'Reset' होते, म्हणजे तिला नवीन नियम लागू होतात. जे नवीन वस्तू किंवा जीव आहेत. ओरिजिनल नाहीत ते एका अज्ञात स्थळी फेकले जातात - तसे, लहानगी ॲना ही त्या अव्यक्त जगात फेकली जाऊन अदृश्य होते. ज्या मूळ १०० पैकी वस्तू आहेत त्या मात्र मूळ ठिकाणी परततात.

'जो' आपल्या ॲना मुलीच्या प्राप्तीसाठी उतावळा होतो. व्हिसल मॉटग्यू मात्र सौदा करावयाला तयार असतो. 'जो' ला एका गोष्टीचा तलाश असतो. तो म्हणजे एक 'वस्तू' मुख्य वस्तू, जी <u>एका थियरीप्रमाणे ह्या रूमच्या वर अधिकार गाजवत असते</u> आणि तिच्या शक्तीमार्फत सगळ्या वस्तूमात्रांवर अंमल करू शकते. ह्या वस्तूच्या पर्यंत पोचण्याच्या मदती बदली तो रूमची किल्ली द्यावयाला तयार असतो. व्हीसलला मात्र वाटत असते की मुख्य चीजवस्तू म्हणजे एक घड्याळ (टेबल मॉडेल) आहे. हे घड्याळ त्याच्या माहितीप्रमाणे कार्ल क्रुझफेल्ड ह्या एका श्रीमंत 'वस्तूसंग्राहकाकडे' असते. त्याच्या मालकीचा एका किल्लेवजा एका गावाकडचा बंगला असतो. 'जो' ह्या समजूतीवर विश्वास ठेवून ह्या घड्याळाची चोरीच करण्यात यशस्वी होतो, पण त्याला ॲना काही मिळत नाही वा सापडत नाही, आणि ही थियरीसुद्धा खोटीच ठरते!!

आता, जेनिफर ब्लूम म्हणून एक सुंदर स्त्री ही <u>'एका नैतिकवादी वस्तुसंग्रह करणाऱ्या संघाची सभासद असते.</u> ह्या संघाचा असा समज असतो की त्या १०० एक वस्तू जर निकालात काढल्या तर <u>सर्वसाधारण सत्याचे रक्षण होईल. (आपल्याकडे डॉ. लागूना जसे वाटते की, 'ईश्वराला निकालात काढले की सेक्युलर सत्याचे रक्षण होईल, तसेच काहीसे).</u>

जेनिफर ब्लूम ही 'जो' डिटेक्टिव्ह ला एक इशारा देते. <u>हा एक ईश्वराची पुन:प्राप्ति करण्याकरिता स्थापलेला क्रूर संहारक मार्गावर विश्वास ठेवणारा पंथ असतो.</u> मार्टि स्वर हा 'जो' चांच, एका काळचा मित्र, ह्या पंथाचा मेंबर असतो. तो पोलिस खात्यात फॉरेन्सिक डॉक्टर, ह्या हुद्दयावर असतो. 'पॉन शॉप' मध्ये झालेल्या खून खराबाच्या शोधात तो सुद्धा, असतो त्या मार्गावर चालताना तो ह्या पंथाचा सभासद बनतो.

कार्ल याचा ठाम विश्वास असा असतो की मुख्य वस्तु ही एका गुह्य कोठी मध्येच आहे. वस्तू संचय व शक्ती याचा 'सुरुवातीचा पंथ' Fundamentalist हा या कोठीतच वावरत असे. परंतु त्याचा एक प्रयत्न फसला. <u>वस्तु व त्यांचा परस्पर संबंध</u> याबरचे त्यांचे गणित चुकून कुठल्यातरी प्रकारच्या अपघातामुळे, हा प्रयोग फसून त्यामुळे त्यांनी काही महत्त्वाच्या 'ह्या शक्तिवस्तू' निवेच

पुरुन ठेवल्या असाव्यात. कार्ल ह्याला, वस्तुमधील एक 'कांचेचा डोळा' हवा असतो. ह्या काचेच्या डोळ्यात शरीरावरील मेद व मांस ह्यांची दुरुस्ती करण्याची शक्ती आहे असा त्याचा विश्वास होता. ('आयर्वेदिय कायाकल्प') कार्लचा मुलगा ल्यूकेमिया ह्या रोगाने ग्रस्त असल्याने त्याला वाचवण्याचा हाच एक उपाय आहे असे त्याला वाटते. त्याच्याही मुलाचे अपहरण झालेले असते. त्यामुळे जो मिलर व कार्ल आपल्या मुलांच्या कारणाकरिता एकत्र येतात.

पण, जेनिफर ब्लूम मात्र 'जो' ला बजावून सांगते की कार्ल वरती विश्वास ठेवू नकोस.

अश्याच धडपडीत त्यांना एक कंगवा, पोलरॉईड, कात्री अश्या शक्ति वस्तू प्राप्त होतात. ह्या पोलरॉईड मधील एक डेव्हलप न केलेला फोटो ही ' महत्त्वाची शक्तीवस्तू असते व काही इतर फोटो हे निरनिराळ्या दरवाज्यांचे असतात. ह्या दरवाज्यामार्फत त्या गुह्य कोठी व मुख्य वस्तू कडे जाण्याचा मार्ग सुकर होणार असतो.

ह्या 'पोलरॉईड' म्हणजे एक प्रकारची खिडकी की ज्यामधून 'Space time' 'वैश्विक दिगकाल व अवकाशातून' प्रवास करुन त्या गुप्त रुम नं १० मध्ये १९६१ वर्षांत प्रवेश करता येणे शक्य असते. ह्या पोलरॉईडमधील 'प्रतिबिंब चित्रात' रुममधील 'Occupant' (एक व्यक्ती) वास करीत असलेली दिसते. त्यामुळे ''Occupant Theory'' खरी असल्याचे त्यांना पुरेपुर पटते.

आणखी काही लहानमोठ्या घटना घडतात. पण मी त्या तुम्हाला सांगणार नाही आहे. आपल्या लेखाच्या मूळ उद्दिष्टांना त्या फारशा आवश्यक नाहीत. प्रत्यक्ष सिनेमा बघणाऱ्यांना त्यांत जरुर रस वाटेल.

आतां मात्र ह्या अनेक लोकांच्या उद्दिष्टांचा केन्द्रबिंदू हा ते 'सनशाईन मोटेल' व त्यांतील रुमस् वर आला आहे. कार्ल ह्याचा उद्देश आपल्या मृत मुलाला 'Resurret' करण्याचा आहे जो ला आपली मुलगी जिवंत व तिच्या स्मृती जागृत ठेवून, हवी आहे.

मार्टि ला त्याला फेकून दिलेल्या वाळवंटात असे स्वप्न पडते असे की तोंच केवळ ह्या वस्तूंचा मालक होणार आहे व त्या योगे खुद्द ईश्वर होणार आहे. (आपल्याकडेही 'भगवान' आहेतच)

'जो' ह्या सगळ्या स्वप्नांचा विश्वासाचा Epicenter शोधून काढतो. त्यासाठी तो वस्तूंचा एक इतिहासाचा ग्राफ' काढतो व वस्तूंचे मार्गक्रमण चितारतो, त्यावरुन अरिझोना ह्या प्रदेशांत मात्र कुठल्याही वस्तूचे भ्रमण झाल्याचे आढळत नाही. तेव्हा 'ग्राफिकली' तो हे ठिकाण निश्चित करतो. व त्याला 'एडी' हा एकाक्ष Occupant (one eyed)प्रतिबिंबांना दिसतो. तो १९६१ पासून बिलकूल उतार वयाचा होत नसतो. तरुणच रहातो!! (कॉम्प्युटर सायन्समध्ये ग्राफ काढण्याचे यंत्र) Geographical Information System आहे तसाच वैश्विक Reality चा!! 'जो' ने आपल्या गुन्ह्याच्या शोध प्रयत्नात ह्याच एडीच्या पत्नीचा ठावठिकाणा शोधलेला असतो. जो जेव्हा रुममध्ये प्रवेश करतो तेव्हा एडी 'जो' च्या हातातील पिस्तोलाची नळी तोंडात लावून स्वत:च्या मरण्याचा प्रयत्न करतो. पण तो अविनाशी वस्तू असल्याने मृत्यू पावत नाही. 'एडीला' ह्या एकटेपणाचा कंटाळा आलेला असतो. पण ह्या वस्तूंमुळे त्याला सतत त्रास होत असतो व इलेक्ट्रिक करंटच्या शॉकसारखे धक्के सतत खावे लागत असतात. (ब्रम्हदेवालाही कंटाळा येतो एकटेपणाचा असे पुराणे सांगतात)

जो त्याला त्याच्या पूर्वाश्रमीच्या, पूर्वलोकातील बायकोच्या भावना सांगतो व तिला अजूनही 'एडी' हवा असतो पती म्हणून हवा असतो असे सांगतो. एडी त्याने सुखावतो. एडी 'जो' ला त्याच्या उद्दिष्टांसाठी मदत करावयाला तयार असतो. पण त्यासाठी रुम नं १० मध्ये

जाणे आवश्यक असते. त्या रुमची किल्ली मात्र कार्लकडे गेलेली असते. कार्ल ने 'जो' ला फसवून व एकाचा खून करुन ती मिळवली असते. जो त्या प्रसंगातून व रुमम धील बंदीतून युक्तीने सुटलेला असतो. केवळ, वॅली ने दिलेल्या 'बस टिकेट' ह्या वस्तूमुळे.

कार्ल हा १९६५ च्या प्रयोगात गुंतलेला असतो रुम नंबर ९च्या गुप्त वस्तु तो मिळवतो व आपल्या मृत मुलाला पाहू शकतो. दरवाजा उघडल्यावर प्रखर पांढरा प्रकाश दिसतो. त्यात मुलाचा चेहरा दिसतो. हा Reality तोडून उघडण्याचा प्रयत्न असतो. तो ह्या प्रकाशात सामील होत असतानाच त्याच्या बरोबर जातो. ह्या धक्क्यातून, 'जो' जेव्हां जागा होतो, तेव्हा तो रुम नं १० मध्ये एडी बरोबर असतो. कार्लचा पत्ताच नसतो.

एडी सांगतो की 'जो' ला एडीला मारण्याखेरीज गत्यंतर नाही. पण जोला माहीत असते की एडी हाही एक वस्तूच आहे व या वस्तूंना मृत्यू नाही. पण एडी त्याला नवीन माहीती देतो की ह्या रुम नं १० मध्ये मात्र वस्तुंचा नाश होऊ शकतो पण त्या वस्तुच्या बदल्यात दूसरी वस्तू संक्रमित व्हावी लागते. 'जो' जर 'Occurpant' व्हावयाला तयार असेल तर त्याला ह्या Occupant च्या सर्व शक्ती प्राप्त होऊ शकतील व मग त्याला आपल्या बेपत्ता किंवा नाश पावलेल्या मुलीला ॲनाला तो मिळवू शकेल. 'जो' विचारतो की ती जिवंत परत पहिल्या जगात येऊ शकेल काय व तिला पूर्व स्मृती सकट जीवन मिळेल काय! त्यावर एडी काही निश्चित सांगू शकत नाही. 'जो' शेवटी एडीला त्याच्या म्हणण्या वर हुकूम मारावयाला तयार होतो व तो त्याला गोळी मारतो व अत्यंत तत्परतेने रुमच्या बाहेर 'किल्ली सगट' सटकतो. त्यामुळे एडीचे शरीर नाहीसे होते व रुम Reset होते.

त्यानंतर 'जो' जेनिफरला स्वत:ला (म्हणजे 'जो' ला) खोलीत कोंडून ठेवावयाला सांगतो किल्ली शिवाय!! म्हणजे , ज्या योगे 'जो' आपल्या ॲनाकडे जाऊ शकेल. जेनिफरला आतां 'जो' बद्दल प्रेम वाटू लागल्याने ती ह्या प्रयोगाला प्रथम नकार देते. पण, जो तिला खात्री देतो, परत येण्याची !! आणि शेवटचा प्रयोग चालू होतो.

<u>शेवटचा सीन</u>

'जो' 'Occupant' बनल्याकारणाने त्याला हे सामर्थ्य प्राप्त होते. ॲना त्याला मिळते. आणि त्याच्या तर्कपद्धती प्रमाणे रुम १० ची किल्ली जेनीफरच्या हातात असल्याने रुम Reset होते. जेनीफर जेव्हा दरवाजा उघडते तेव्हां जो, ॲना व जेनिफर ह्यांचे मीलन होते!!

जो, नंतर किल्ली रुम नं १० मध्ये टाकतो व दरवाजा बंद करतो. त्याला वाटत असते की किल्ली आता कुणालाही मिळणार नाही. पण त्या उध्वस्त मोटेलकडे ते जेव्हां परततात, तेव्हां किल्ली बेपत्ता असते बहुतकरुन त्याचे कारण म्हणजे <u>पहिल्या 'Occupant' कडून जेव्हा अनेक वस्तू जगभर वितरल्या गेल्या त्याप्रमाणे पुन:परिस्थिती पहिल्यासारखीच प्राप्त झाली असणार!! (Creation of the Universe ब्रह्माची विश्वनिर्मिती)</u>

<u>गूढ संवाद</u>

बापरे!! ही गोष्ट एखाद्या बालबुद्धीच्या गोष्टी वेल्हाळासारखी तुम्हाला सांगताना माझ्या अंतरंगात बाबूराव अर्नाळकर, नाथमाधव किंवा धारप यांसारखे सिद्धहस्त भयकथा, गुप्तकथा सांगणाऱ्यांची भूते नाचत होती, असा भास झाला.

पण, ही गोष्ट जशी सिनेमात दाखवली आहे ती तशीच तुमच्यापुढे सांगण्याखेरीज गत्यंतर नव्हते. शिवाय, लिहून शब्दांकित स्वरुपात Textuatlly गोष्ट सांगणे Audo Visual व Montages, cut scenes, close up, motor perception, motion parallax, soundeffects colour changes, perspective

texture, Jump Cuts etc. वगैरे तांत्रिक युक्त्या योजून दाखवणे यांत जमीन अस्मानाचा फरक आहेच. तो कसा भरुन काढणार!!

मुद्दा हा आहे की ह्या अनुभूतींच्या प्रवासात कायकाय युक्त्या योजिल्या आहेत? त्याचा अपेक्षित परिणाम साधण्यासाठी प्रेक्षकांची कोणती बैठक, विश्वास मन, भावना बैठक गृहीत धरलेली आहे. हे थोडक्यात बघणे आकर्षक ठरावे.

**<u>माणूस हा एक 'Stimulus Response Machine' आहे Key Board वर चालणारा भावनाशून्य यंत्र नव्हे !!</u>**

फिल्म हे ह्या भावना संवादक्षम मानवाला एका सामर्थ्याने काबूत ठेवत असते त्याच्या वृत्ती व समजांवर व विश्वासांच्या पार्श्वभूमीवर कठपुतलीप्रमाणे नाचवत असते. फिल्म डायरेक्टर, कॅमेरामन, अ‍ॅक्टरस् व प्रत्यक्ष चलच्चित्र हे 'मानव नामी' भक्षाला गिळंकृत करण्याचा जबरदस्त प्रयोगात गुंतलेले असते.

'ड्रॅकुला' ह्या गाजलेल्या चित्रपटांत ड्राकुला हा अर्धवट जिवंत प्रेत एका (भक्ष) स्त्रीच्या (Victim) गळ्याला दांत लावून रक्त पीत असतो व त्याला क्रॉस दाखवल्यावर तो निमूटपणे जातो. असे दृश्य चित्रपटांत चालू असतांना माझ्या समोरच्या खुर्चीवर बसलेली एक ख्रिश्चन स्त्री भयाने कांपत होती. तिला सांवरण्यासाठी मी डोअरकीपरला विनंती केली की तिला बाहेर घेऊन जा, नाहीतर भयाने तिचा जीव जाईल!!

पण, मी मात्र थंडपणे हा चित्रपट पाहू शकत होतो. हा फरक का? कारण ती स्त्री 'ख्रिश्चन रोमन कॅथलिक धर्माने' संस्कारित होती व मी त्यावेळेला पूर्ण मार्क्सिस्ट होतो (आता वैदिक स्पिरीच्युअलिस्ट आहे.) त्यामुळे सच्च्या कम्यूनिस्ट सारखे कोणतांही भारतीय सांस्कृतिक बैठक नव्हती. मी सेक्यूअर होतो अपवाद फक्त भौतिक सायन्स ह्या विश्वासाची व विरोध विकासवादाची बैठक!!


तेव्हा ह्या चित्रपटांत मी ज्या ज्या वाक्यांखाली ठळक व अधोरेखीत छापले आहे, ती वाक्ये पुन्हा एकदां काळजीपूर्वक व स्वत:च्या विश्वास, धर्मसमजूती विज्ञाननिष्ठा, तत्वज्ञानांची बैठक, सिनेमा चित्रपटगृहातील तटस्थता, अलिप्तता व संस्कारक्षमता, भावना संवेदना क्षमता ह्या पार्श्वभूमीवर तपासून पहा, पडताळून पहा आणि मग ह्या Audio-Visual Medium च्या प्रयोगाला तुमचे ''Stimulus Response Machine'' व 'Congnitive apparatus' काय प्रतिक्रिया देते ते अजमावून पहा. तुमच्या देहांत व कॉशसनेसमध्ये अश्या काय योजना व प्रोग्रॅमस आहेत की तुम्हाला त्या अजाणतेपणे प्रभावित करत आहेत? (डॉ. लागू ज्या तटस्थतेच्या व सेक्यूलॅरिझमच्या खात्रीत वावरतात त्या क्षमतेचे तुम्ही आहात का?) गॉडला मारण्याची तुमची हिंमत आहे का !! जशी फ्रेडरिक निशे ह्या जर्मन तत्वज्ञानाच्या प्रोफेसरची , हिटलरची, स्टालीनची, माओत्से तुंगची होती?

आपल्या 'The Lost Room' ह्या चित्रपटातही 'Multiple levels of Symbolism' चा वापर आहे, जसे संत रामदास यांच्या आध्यात्मिक दासबोधात १४ ब्रह्मांडे, सात लोक व अनेक जग यांचे अनुभूतीतील सत्य दर्शन आहे तसेच काहीसे!!

ख्रिस्तोफर लिऑन नावाचा एक लेखक म्हणतो की ह्या चित्रांतील 'Objects' म्हणजे वस्तू ह्यांच्यामुळे आपल्या ज्या भावना उद्दीपित होतात (म्हणजे उदाहरणार्थ ॲना ह्या मुलीबद्दल 'जो मिलर' च्या मनांत) त्याचे मोजमाप

'Rorschach Test' 'रॉशाच टेस्ट' ह्या पद्धतीने घ्यावयाला हव्यात. ही एक वादांच्या भोवऱ्यात सापडलेली 'टेस्ट' आहे. 'Ink-blots' निरनिराळे शाईचे डाग दाखवून

मानसशास्त्र काही तर्क रचतात व निष्कर्ष काढतात तसे काहींसे.



चित्र नं  Slip No. 2

Three ink blots.
Rorschach Test

**जीवनाचा चिरंतन मोह**

पण, ह्या सर्व विश्वास, धर्मसमजुती, विश्वरचना यांच्या भयंकर घोटाळ्यात एक फरक, किंवा नीतिमत्ता किंवा भावनिक सत्य मात्र संचार करीत असतांना दिसते. कोणते ते सत्य?

कार्ल आपल्या मृत मुलाला व त्याच्या आठवणीने व्याकूळ झालेल्या आपल्या अस्तित्वाला या जगाला सोडून त्या मुलाच्या जगांत राहाणे निवडतो. उलट, 'जो मिलर' ला ॲना ह्या आपल्या आवडत्या प्रिय अश्वा मुलीला (ह्या अनंतकोटी, अनंत ब्रह्मांडे-भारतीय समजूतीत) परलोकांत Heavens मध्ये गमावल्यानंतरही व त्याला स्वत:ला प्रतिपरमेश्वर बनण्याची 'ऑफर', संधी असतानाही ह्या मर्त्य पृथ्वीवरच व 'जेनिफर क्लून' ह्या सुंदरी बरोबर इथल्या सगळ्या भावना विश्वाला धक्का न लावता व त्याच भूमिकेवर, त्याच काळांत त्याच स्थितीकाळात व पूर्व स्मृती तश्याच ठेवून, पुढचे 'मर्त्य' आयुष्य जगणे पसंत करतो.

आपलेही निर्णय जवळ जवळ 'जो' सारखेच असतील नाही का?

**चित्रपट उपनिषद**

मग, जर ह्या चित्रपट कथेने आपल्या भावनांना, विश्वासांना धक्का देऊन तुम्हाला वैदिक ऋषींच्या 'प्रश्नोपनिषद' ह्या उपनिषदांच्या बैठकीवर बसवले तर मी म्हणेन की 'वसुंधरा राजे' (अन्नपूर्णा देवी) किंवा 'सोनिया गांधी' (ह्या दुर्गादेवी) किंवा 'वंदे मातरम' ह्या 'Symbolism' पेक्षाही असे Audio-Visual माध्यम केवळ तीन चार तासांत तुम्हाला प्रश्नबैठक, विश्वास बैठक, जीवन बैठक, यांच्या स्तरावर प्रभावित करु शकते.

तेव्हा, तुम्हाला या एकाच लेखात खोल तत्वज्ञानाच्या आध्यात्मिक गर्तेत टाकण्याचा माझा मानस नाही.

आपण पुढच्या लेखात भारतीय संस्कृती,
ह्या वादाचा काय निकाल लावते, ते
जरुर पाहू या. तूर्त दिशाच्या पुढल्या
अंकाची, कृपा करुन, वाट पहा!! आभारी
राहेन!!

**यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट, सारस्वत बँकेजवळ,
अग्यारी लेन ठाणे - ४०० ६०१
दूरध्वनी क्र: २५३६६८४५०,
ई-मेल yrsane@eth.net

# किशोरांची नवनिर्मिती स्पर्धा: चीनचा स्तुत्य उपक्रम

*चीन येथील शैक्षणिक सहलीत आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांसह गेलेले डॉ. सुधाकर आगरकर यांचा विशेष लेख. - संपादक*

जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी आणि आपल्या देशाला प्रगत राष्ट्राचा दर्जा प्राप्त करुन देण्यासाठी चीनने अलिकडच्या काळात अनेक पावले उचलली आहेत. रस्ते, वीज, पाणीपुरवठा या सुविधांकडे विशेष लक्ष देऊन त्या जागतिक दर्जाच्या करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या अनेक कारखान्यांना सुविधा देऊन त्यांना आपल्याकडे पाचारण केले. त्याचबरोबर तरुण पिढीच्या विकासासाठी शैक्षणिक बद्दल अमलात आणले. आजची किशोरवयीन मुले ही भावी चीनचे आधारस्तंभ आहेत हे त्यांनी ताडले आणि त्यांच्या सृजनशीलतेला वाव देण्यासाठी उपक्रम राबवायला सुरुवात केली.

देशाच्या प्रगतीसाठी विज्ञान आणि तंत्रज्ञानाची कास धरण्याची गरज आता सर्वच राष्ट्रांनी ओळखली आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा विकास आणि त्याच्या मदतीने देशाचा विकास यासंबंधी योजना आखण्यासाठी चीनने ''चीन विज्ञान आणि तंत्रज्ञान संघटना'' (China Association of Science and Technology) या संघटनेची स्थापना केली. या संघटनेत किशोर विज्ञान चर्चापीठ (Youth Science Forum) असा एक विभाग आहे. या विभागाच्यावतीने देशभर विज्ञान आणि तंत्रज्ञान नवनिर्मिती स्पर्धा (Science and Technology Innovation Contest) आयोजित केली जाते. ही स्पर्धा प्राथमिक, माध्यमिक तसेच उच्च माध्यमिक शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी खुली आहे. प्रथम जिल्हा स्तरावर नंतर विभागस्तरावर आणि सगळ्यात शेवटी राष्ट्रीय स्ततरावर ही स्पर्धा आयोजित केली जाते. जिल्हा स्तरावर निवडलेले प्रकल्प विभागस्तरावर जातात.त्यानंतर विभागस्तरावर निवडलेले प्रकल्प राष्ट्रीय स्तरावर जातात. देशाच्या ३५ प्रांतातून (Provincs) सुमारे ५०० प्रकल्प राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेकरिता सामील केले जातात. देशाच्या वेगवेगळ्या भागात या स्पर्धेचे आयोजन केले जाते. आतापर्यंत अशा २१ स्पर्धा अयोजित करण्यात आल्या आहेत. २२ वी स्पर्धा चीनच्या युन्नान प्रांतातील कुनमिंग या शहरात ऑगस्ट १ ते ४ या कालावधीत आयोजित करण्यात आली होती.

चीन विज्ञान आणि तंत्रज्ञान संघटनेने आयोजित केलेली ही स्पर्धा प्रामुख्याने चिनी विद्यार्थ्यांसाठीच असते. परंतु मागील काही वर्षापासून या स्पर्धेला आंतरराष्ट्रीय स्वरुप देण्याचा प्रयत्न या संघटनेने केला आहे. त्यासाठी मित्र देशातील काही प्रकल्प या स्पर्धेत सामील केले जातात. भारताचा समावेश या स्पर्धेत प्रथमच करण्यात आला. ठाण्याच्या सी. ए.के. जोशी इंग्रजी माध्यम शाळेतील विद्यार्थ्यांनी केलेला प्रकल्प सादर करण्यासाठी चीन विज्ञान तंत्रज्ञान संघटनेने पाचारण केले होते. २००६ च्या सप्टेंबर महिन्यात या संघटनेचे काही पदाधिकारी मुंबईला आले होते. भारतातील विज्ञान शिक्षणाचा अभ्यास करणे हा त्यांचा उद्देश होता. या भेटीत त्यांनी ए.के. जोशी शाळेला भेट देऊन तेथील विद्यार्थ्यांनी केलेले काही विज्ञान प्रकल्प त्यांनी पाहिले. त्यातल्यात्यांत राष्ट्रीय स्तरावरील पोहोचलेल्या हायड्रोफोनिक्स (Hydroponics) या विषयावरील प्रकल्पाने त्यांचे लक्ष वेधून घेतले. या प्रकल्पात केवळ पाण्याचा वापर करून वनस्पती वाढविता येतात हे विद्यार्थ्यांनी दाखविले. फेकून दिलेले प्लॅस्टिकचे

डबे, नारळाच्या काथ्या, लाकडे अशा टाकाऊ वस्तूंचा वापर करून त्यांनी हा प्रकल्प  बनविला होता. ह्या प्रकल्पाचा आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत समावेश करण्याची तयारी भेट देणाऱ्या अधिकाऱ्यांनी दाखविली. एवढेच नव्हे तर मायदेशी परत गेल्यावर तसे औपचारिक निमंत्रणही पाठविले. या निमंत्रणावरून ठाण्यातील ४ विद्यार्थी, २ शिक्षिका, विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर आणि मी स्वत: असा ८ जणाचा चमू कुनमिंगला जाऊन आला.

चीनच्या दक्षिणेला असलेला युन्नान प्रांत हा तसा मागासलेला भाग आहे. परंतु मागासलेपणाची कोणतीही लक्षणे कुनमिंग या प्रांत राजधानीच्या शहरात दिसत नाहीत. शहरातील रस्ते, इमारती आणि इतर सुविधा त्यांच्या प्रगतीची साक्ष देतात. शहरात भव्य असे आंतरराष्ट्रीय समारंभ केंद्र (Internatinal Convertion Centre) बांधण्यात आले आहे. साधारणपणे ३००० जणांना बसता येईल एवढे प्रशस्त सभागृह या केंद्रांच्या तळमजल्यावर आहे. या सभागृहातच स्पर्धेचा उद्घाटन सोहळा पार पडला. वरच्या मजल्यावर त्यापेक्षा थोडेसे लहान असे सभागृह आहे. तेथे स्पर्धेचा समारोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. या सभागृहाच्या पुढे दोन प्रशस्त प्रदर्शन केंद्रे बांधण्यात आली आहेत. प्रत्येक केंद्रात प्रवेश केला तेव्हा सर्व व्यवस्था चोख असल्याचे लक्षात आले. प्रत्येक प्रकल्पासाठी ३ फूट  ×१० फूट असे तीन फलक उपलब्ध करून देण्यात आले होते. प्रत्येक फलकावर दिवा आणि विजेसाठी जास्तीचा प्लग अशी व्यवस्था होती. त्याचबरोबर प्रत्येक फलकापुढे ठेवायला एक छोटेसे टेबल दिलेले होते. टेबलेदेखील काम संपले की घडी करून ठेवता येतील अशा पद्धतीने बनविलेली होती. भारताखेरीज डेन्मार्क, जर्मनी, हंगेरी, जपान आणि कोरीया हे देशदेखील स्पर्धेत सहभागी झाले होते. त्याचबरोबर इंटेल स्पर्धेत विजयी ठरलेल्या काही विद्यार्थ्यांचे प्रकल्प देखील यात समाविष्ट केलेले होते. आंतरराष्ट्रीय स्पर्धकांना आपले प्रकल्प  ठेवण्यासाठी वेगळीच जागा देण्यात आली. देशाचे नाव दाखविणारा तसेच प्रकल्पाचे नाव दाखविणारा असे दोन फलक आधीच लावून ठेवलेले होते. आम्हाला दिलेल्या तीन फलकांपैकी दोन फलकांवर आम्ही प्रयोगाचे वर्णन करणारे पोस्टर्स लावले आणि तिसऱ्या फलकावर एलसीडी प्रोजेक्टरच्या मदतीने वेगवेगळ्या वनस्पतींची चित्रे दाखविण्याची व्यवस्था केली. हायड्रोकोनिक्स या तंत्राचा उपयोग करून प्रकल्पात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी अनेक वनस्पती वाढविल्या होत्या. त्या वनस्पती चीनमध्ये न्यायला  परवानगी नसल्याने आम्ही त्यांची चित्रफीत तयार केली. तीच या फलकावर दाखवित राहिलो.

प्रत्यक्ष वनस्पती नेता आल्या नाहीत तरी हायड्रोकोनिक्सचे पात्र, काही बिया आणि त्याच्या वाढीसाठी लागणारे क्षार आम्ही सोबत घेऊन गेलो. तिथे गेल्याबरोबर त्या बियांचे अंकुरण होईल अशी व्यवस्था आम्ही केली. त्यामुळे बिजांकुरण आणि वनस्पतींची सुरुवातीची वाढ आम्हाला दाखविता आली.



भारतीय चमू

टाकाऊ वस्तूंचा वापर करून केलेला प्रयोग, त्याची सध्याच्या स्थितीत असलेली उपयुक्तता, प्रत्यक्ष

वाढविलेल्या वनस्पतींची चित्रफीत याखेरीज भारतीय प्रकल्पाची आणखी काही वैशिष्ट्ये होती. त्यापैकी एक म्हणजे विद्यार्थ्यांचा गणवेश. प्रकल्पातील चारही विद्यार्थी शाळेचा गणवेश घालून प्रकल्पाचे सादरीकरण करीत होते. त्यामुळे ते जीन्सची पँट आणि टी शर्ट घातलेल्या इतर विद्यार्थ्यांहून वेगळे दिसत होते. विद्यार्थ्यांप्रमाणेच साड्या नेसलेल्या शिक्षिकेचेही वेगळेपण दिसून येत होते. या कारणांमुळे तसेच भारताबद्दल असलेल्या कुतूहलामुळे भारतीय प्रकल्पाच्या पुढे सतत गर्दी असायची. त्या गराड्यातील विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तरे देणे हे खरोखरच जिकिरीचे काम होते. प्रकल्पात सहभागी झालेल्या चारही विद्यार्थ्यांनी ते काम समर्थपणे पेलले. त्यांनी आपला प्रकल्प एवढ्या प्रभावीपणे सादर केला की परीक्षकांनी देखील सर्वांत जास्त वेळ याच प्रकल्पाजवळ खर्च केला. दूरचित्रवाणीच्या चमुने या विद्यार्थ्यांची विशेष मुलाखत घेतली. भारतीय प्रकल्पाला आंतरराष्ट्रीय स्पर्धेत Outstanding Achievement Award देऊन गौरविण्यात आले. भारतीयांच्या दृष्टीने ही खरोखरच अभिमानाची गोष्ट आहे.



विद्यार्थी प्रकल्प सादर करताना

स्पर्धेचे आयोजन अतिशय पद्धतशीरपणे करण्यात आले. कुठेही अवडंबर नाही की बडेजावपणा नाही. उद्घाटन आणि समारोप या दोन्ही समारंभात अगदी निवडक पाहुण्यांनी मोजक्या शब्दात भाषणे केली. दोन्ही समारंभात कुणीही स्टेजवर बसले नाही. पाहुणे प्रेक्षकात बसलेले असत. त्यांच्या नावाचा उल्लेख होताच ते स्टेजवर येत आणि काम झाल्याबरोबर लगेच आपल्या जागेवर जाऊन बसत. स्पर्धेत आलेले प्रकल्प देखील उच्च दर्जाचे होते. प्रांत स्तरावर बक्षिसपात्र प्रकल्पच या स्पर्धेत सहभागी झालेले होते. विद्यार्थ्यांचा उत्साह ओसंडून वाहात होता. आपले प्रकल्प सांगण्यासाठी ते कमालीचे उत्सुक होते. परंतु अडचण होती भाषेची. प्राथमिक आणि उच्च प्राथमिक स्तरावरची मुले इंग्रजीत संभाषण करू शकत नव्हती. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना मात्र इंग्रजी येत होती. त्यांच्या प्रकल्पात तंत्रज्ञानाचा पुरेपुर समावेश केलेला असायचा. चीनच्या तांत्रिक प्रगतीचे ते द्योतक होते.



पारितोषिक स्वीकारताना भारतीय विद्यार्थी

स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना संघटनेच्यावतीने मोठ्या संख्येने पारितोषिके देण्यात आली. विशेष उल्लेखनीय बाब अशी की अनेक खाजगी कंपन्या या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यासाठी पुढे येतात. काही कंपन्यानी वस्तूंच्या स्वरूपात तर काही कंपन्यानी पैशाच्या स्वरूपात बक्षिसे वाटली. बीजिंग येथील विज्ञान/तंत्रज्ञान

विद्यापीठाने वेगळ्याच स्वरूपाचे बक्षीस जाहीर केले. या विद्यापीठात प्रवेश मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश परीक्षेला बसून त्यात चांगले यश मिळवावे लागते. राष्ट्रीय स्तरावरच्या स्पर्धेत उच्च माध्यमिक स्तरावरच्या विद्यार्थ्याने जर बक्षीस मिळविले तर त्याला बेजिंग विद्यापीठात सरळ प्रवेश दिला जातो. त्यांना प्रवेश परीक्षेला बसण्याची गरज नाही. अशाप्रकारे प्रवेशास पात्र ठरलेल्या सुमारे २० विद्यार्थ्यांना मंचावर बोलाविण्यात आले. तेव्हा त्यांचा आनंद गगनात मावेना. राष्ट्रीय स्तरावरची नवनिर्मिती स्पर्धा ही किशोरवयीन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने एक अतिशय महत्त्वाची घटना आहे. आपल्याकडेही अशा स्पर्धा होतात. परंतु चीनच्या स्पर्धेचा वेगळेपणा सहज नजरेत भरतो. प्रकल्पाच्या सादरीकरणाबरोबरच हाताने काम करण्याची संधी या विद्यार्थ्यांना दिली जाते. त्यासाठी लहान आकाराचे लेथ मशीन, ड्रील मशीन इत्यादी साधने उपलब्ध करुन दिली जातात. वेगवेगळे मनोरंजक प्रयोग करता यावे यासाठी काही संस्थानी आपले स्टॉल लावलेले असतात. याखेरीज विज्ञान प्रश्नमंजुषा, विज्ञान खेळ अशा स्पर्धा आयोजित केल्या जातात. विद्यार्थ्यांबरोबर आलेल्या शिक्षकांना गुंतवून ठेवण्यासाठी टिचर्स फोरमचे आयोजन केले जाते. यात शिक्षक आपल्या अनुभवांची देवाणघेवाण करतात. एकंदरीत चीनची राष्ट्रीय स्पर्धा ही सृजनशीलतेला वाव देणारी स्पर्धा आहे असे म्हणणे वावगे होणार नाही. आपल्यालाही यापासून अनेक गोष्टी शिकता येण्यासारख्या आहेत.

**डॉ. सुधाकर आगरकर**
४,अनिल को-ऑप. सोसायटी,
नगरपालिका प्राथमिक शाळेजवळ, काटेमनावली,
कल्याण (पूर्व)
दूरध्वनी: ९१-२५१-२३३२५२१
Email: s_agarkar@hotmail.com

•••

## भगवद्गीता - संक्षिप्त माहिती

श्रीमत् भगवद्गीतेचे एकूण अठरा अध्याय व सातशे श्लोक आहेत. महाभारत ग्रंथात भीष्मपर्वात गीतेचा समावेश आहे. भारत युद्धारंभ प्रसंगी अर्जुनाच्या मनात उत्पन्न झालेली युद्ध पराङ्मुखता, धार्मिक, व्यावहारिक, व नैतिक सर्व दृष्टिंनी विचार केला असता, धर्म व कर्तव्य या दृष्टीने युद्ध करणेच श्रेष्ठ असे कृष्णांनी केलेले प्रतिपादन, हा या ग्रंथातील महत्त्वाचा भाग आहे. त्यांतील तत्त्व ज्ञान, त्याची मांडणी बहुजन समाजाला अत्यंत उपयुक्त ठरले अशी आहे. या ग्रंथावर अनेक विद्वानांनी आचार्यांनी भाष्य ग्रंथ लिहिले आहेत. तसेच अनेक भाषांत अनुवाद व टीकात्मक ग्रंथ आजपर्यंत लिहिलेले आहेत. त्या सर्वांचा संग्रह करणे व सारांश काढणे अत्यंत अशक्य कोटीतल काम आहे. या ग्रंथांत प्रतिपादन केलेले तत्त्वज्ञान हे त्या काळी प्रसारित असलेल्या भिन्न भिन्न विचारसरणींचा समन्वय करुन मांडलेले, व कोणत्याही मतप्रणालीचे खंडन न करता अत्यंत उच्च भूमिकेवरून आहे.

भगवद्गीता हा संवादरूपी ग्रंथ आहे. त्यामुळे काही गोष्टी पुन:सांगितल्या गेल्या आहेत. काही गोष्टींविषयी ही संदेह निर्माण होतो. उदाहरणार्थ गीता ही कर्मयोगपर आहे की ज्ञान योगपर, तसेच ज्ञानोत्तर कर्म करणे अशक्य आहे किंवा नाही. गीतेत आत्मद्वैत प्रतिपादले आहे का? भक्ताने परमेश्वराची सर्व कर्म समर्पण पूर्वक करावीत या सिद्धांताप्रमाणे द्वैत सूचित केले आहे. गीतेचे नि:संशय प्रतिपादन काय आहे, हे समजणे अति कठीण काम आहे.

- शं. बा. मठ

# आमची चीन यात्रा..... !!

*चीनमधील आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात आमच्या आनंदीबाई जोशी विद्यालयामधील विद्यार्थ्यांचा प्रकल्प समाविष्ट होता. या निमित्ताने चीनमधील या प्रदर्शनासंबंधातील लेख. -संपादक*

Institute of Oriental Study, (IOS) Thane या संस्थेने गेली काही वर्षे परदेशातील व भारतातील शिक्षणतज्ज्ञ, संस्थाचालक, शिक्षक यांच्या एकमेकांच्या देशांत भेटी घडवून अणण्याचा एक स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. संस्थेचे उत्साही अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी गेल्या वर्षी डॉ. सुधाकर आगरकर (होमी भाभा विज्ञान केंद्र) यांच्या मार्फत चीनमधील अशा लोकांना भारत भेटीसाठी आमंत्रित केले होते. श्री. पेंग झी हे चिनी गटाचे प्रमुख म्हणून येथे आले होते. या भेटीतून या दोन देशांतील संस्थांमध्ये एक मैत्रीचा धागा निर्माण झाला आणि त्याचंच फलित म्हणजे 22nd China Adolescent Science & Technology Invention Contest मध्ये (CASTIC) सहभागी होण्यासाठी IOS ला मिळालेलं निमंत्रण !

दरवर्षी चीनमध्ये राष्ट्रीय स्तरावर ९ ते १८ या वयोगटातील मुलांसाठी या स्पर्धेचं आयोजन केलं जातं. प्रत्येक प्रांतातून त्या स्तरावर निवडून आलेली जवळजवळ ५०० हून जास्त मुले या स्पर्धेत सहभागी होतात. या वर्षी परदेशातून याच वयोगटातील मुलांना स्पर्धेत भाग घेण्यासाठी नाही तर, आपापले प्रकल्प प्रदर्शनांत मांडण्यासाठी आमंत्रित केलेले होते. चीनमधील मुलांसाठी मात्र ही स्पर्धा अत्यंत चुरशीची होती. 22nd CASTIC ची ही स्पर्धा युनान प्रांतामधील 'कुनमिंग' या राजधानीच्या ठिकाणी दि. १ ऑगस्ट ते ३ ऑगस्ट २००७ या कालावधीत आयोजित केली होती.

विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी सौ. ए.के. जोशी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. कालिंदी कोल्हटकर यांच्या समोर 22nd CASTIC मध्ये शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याचा प्रस्ताव मांडला. कोल्हटकर मॅडमनी हा प्रस्ताव अर्थातच स्वीकारला आणि आम्हां सर्वांना चीनयात्रेची ही सुवर्णसंधी प्राप्त झाली.

गेली ३ वर्षे सातत्याने आमच्या शाळेचे प्रकल्प राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धांसाठी निवडले जात आहेत. या पाठीमागे शाळेच्या विज्ञान शिक्षिका पूर्णिमा साठे, त्यांच्या सहकारी शिक्षिका मीना निफाडकर आणि या सर्वांचे प्रेरणास्थान असलेल्या मॅडम कोल्हटकर या सर्वांचे अथक प्रयत्न आहेत. सन २००५ मध्ये आमच्या शाळेने Hydroponics हा पाण्यावरील शेतीविषयक प्रकल्प तयार केला होता. 'या प्रकारच्या झाडे वाढविण्याच्या पद्धतीमुळे पाण्याची बचत होते.' असा सिद्धांत मांडणारा हा प्रकल्प आहे. स्थानिक, जिल्हा व राज्य स्तरीय पातळ्यांवर जिंकून संपूर्ण भारतातून जे प्रकल्प राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांच्या समोर सादर झाले, त्यातील एक हा प्रकल्प होता. त्यामुळे सर्वानुमते Hydroponics हाच प्रकल्प 22nd CASTIC साठी नेण्याचे ठरले. त्यानुसार ४ मुलांचा संघ व त्यांच्या शिक्षिका जोमाने कामाला लागल्या. निकिता शहा, साहील कार्णेकर, अमला भागवत, निहारिका मुंगळे हे चार विद्यार्थी पूर्णिमा साठे, अपर्णा भोळे या शिक्षिका, डॉ. विजय बेडेकर व डॉ. सुधाकर आगरकर असा आठ जणांचा संघ चीन दौऱ्यासाठी सज्ज झाला. भारताबरोबर हंगेरी, डेन्मार्क, यु.एस्., कोरिया, जपान, जर्मनी, हाँगकाँग या देशांतील मुलेही 22nd CASTIC मध्ये सहभागी होणार होती.

दि. २८ जुले २००७ रोजी रात्री ११.२५ वाजता 'थाव एअरवेजच्या' विमानातून आम्ही चीनसाठी प्रस्थान ठेवले. त्याआधी शाळेकडून व विद्या प्रसारक मंडळाकडून आमच्यासाठी खास निरोपसमारंभ झाला होता. त्याच्या आठवणी मनात रेंगाळत होत्याच. ज्या शहरात जाणार होतो. त्याची व चीनविषयीची बरीचशी माहिती आम्ही गोळा केली होती. तरीही प्रत्यक्ष चीनमध्ये पाऊल टाकल्यावर असंख्य न वाचलेल्या गोष्टीही आम्हांला अनुभवायला मिळाल्या. २९ जुलैला सायंकाळी ५.३० वाजता आम्ही चीनमधील कुनमिंगला पोहोचलो. मधे बँकॉक व चिएनमाई येथे थांबले होते.

दुसऱ्या दिवशी म्हणजेच ३० जुलैला आम्हाला प्रकल्पाच्या मांडणीसाठी Kunning International Convention & Exhibition Centre येथे नेण्यात आले.

चीनमध्ये पाऊल ठेवल्यापासून मोठ मोठे रस्ते, पूल, जागोजागी ठेवण्यात आलेल्या मोकळ्या जागा, मोठमोठे टी.व्ही. जागोजागी ठेवलेले आणि झाडाफुलांची सजावट पाहून आम्ही भारावून गेलो होतो. आजचा प्रदर्शनाचा हॉल पाहून तर आम्ही थक्कच झालो. २० ते २२ हजार चौरस फुटांचा (अंदाजे) असा प्रशस्त हॉल, त्यात प्रत्येक स्टॉलसाठी ६ फूट x ४ फूट जागा देण्यात आली होती. परदेशांतील मुलांसाठी वेगळा विभाग करण्यात आला होता. प्रत्येक गोष्टीचे नियोजन अत्यंत शिस्तबद्ध होते. कुनमिंगला उतरल्यापासून भाषेचा अडसर दूर करण्यासाठी 'ग्रेस' नावाची एक इंग्रजी जाणणारी चिनी मुलगी आमच्याबरोबर सतत राहणार होती. तिने आम्हाला लागणाऱ्या सर्व वस्तू उपलब्ध करून दिल्या.

दि. १ ऑगस्ट २००७ रोजी सकाळी ९.३० वाजता 22nd CASTIC चा शानदार उद्घाटन सोहळा पार पडला. या सोहळ्यात सर्वच भव्य व दिव्य होतं. ज्या वास्तूत हा उद्घाटन समारंभ होता ती वास्तूदेखील खूप मोठी होती. बाहेरच्या प्रशस्त आवारात स्वागतासाठी लोकनृत्याचा एक गट नृत्य करत होता. दोन स्त्रिया कुठल्यातरी झाडाच्या छोट्याश्या फांदीने प्रत्येकाच्या मस्तकाला स्पर्श करून पारंपरिक पद्धतीने स्वागत करीत होत्या. हॉलमध्ये प्रवेश केला आणि छताला टांगलेल्या मोठमोठ्या झुंबरांनी आमचं लक्ष वेधून घेतलं. संपूर्ण हॉल उत्फुल्ल चेहऱ्यांच्या व बारीक डोळ्यांच्या बाळगोपाळांनी भरून गेला होता. सांगायला अभिमान वाटतो की आमचे पारंपरिक भारतीय वेष, हातातील तिरंगी झेंडे आणि आमच्या शाळेच्या गणवेषातील मुले यामुळे सर्वांच्या नजरा कुतूहलाने आमच्याकडे पुन्हा पुन्हा वळत होत्या. चिनी भाषेत भारताला 'इन्दु' म्हणतात. 'इन्दु पिपल' असे एकमेकांत आमच्याबद्दल बोलत होते. तिथल्या स्थानिक पत्रकारांनी तर आमच्यावर कॅमेऱ्याच्या 'क्लिकक्लिकाटाचा' वर्षावच केला.

समोर भव्य व्यासपीठ, आकर्षक सजावट, वरच्या भागावर चार मोठे पडदे ज्यावर सतत चीन देशातील आकर्षक स्थळे, संस्कृती व खेळ यांचे दर्शन होत होते. मोजक्याच लोकांची थोडक्यात भाषणं, व्यासपीठावर टेबल, खुर्च्या काहीही नाही. चिनी राष्ट्रगीताची धून सर्वप्रथम वाजवली गेली. प्रत्येक प्रांतांच्या प्रतिनिधी विद्यार्थ्याने सहभागी झाल्याची घोषणा दिली. व व्यासपीठावर असलेल्या रॉकेटमध्ये तो शिरला. या कार्यक्रमासाठी एक खास गीत सादर करण्यात आलं. शब्द समजले नव्हते पण त्यातील जोश व ताल अगदी आतपर्यंत पोचत होता. सर्व मुलांना शपथ देण्यात आली आणि सर्वजण शिस्तीने आपापल्या स्टॉलकडे जाऊ लागले.

दोन दिवसांपूर्वी आमच्या स्टॉलची मांडणी झालेली होती. अनेक लहानमोठ्या व्यक्तींनी, मुलांनी आमच्या स्टॉलला भेट दिली. मुलांनी ग्रेसच्या मदतीने प्रकल्प छान पद्धतीने समजावून सांगितला. इंग्लिश फार छान येत नव्हतं, तरी समजून घेण्याची दांडगी इच्छा

जवळजवळ सर्वांनाच होती. प्रश्नही विचारत होते.

दुपारनंतर प्रदर्शनात फेरफटका मारला. सर्व परदेशी मुलांचे व चिनी मुलांचे स्टॉल पाहिले. हाँगकाँगच्या एका मुलाला त्यांच्यापैकी इंग्रजी येत होतं. त्याने चिनी मुलांचे प्रकल्प समजून घेण्यासाठी खूप मदत केली. इथल्या मुलांची संशोधनप्रवृत्ती व बुद्धी पाहून थक्क व्हायला झालं. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात या देशाने विलक्षण झेप घेतली आहे. प्रत्येक स्टॉलवर मुलांकडे छोटे संगणक होते. प्रकल्पाचे सर्व चार्ट उत्तमरीत्या छापलेले होते. शाळेतील मुलांवर या कामासाठी भरपूर खर्च केलेला जाणवत होता.

चौथीत असलेल्या एका मुलीने मक्याच्या कणसांतून भराभर दाणे वेगळे करण्याचे यंत्र शोधून काढले होते. दुसऱ्या एका स्टॉलवर एका छोट्या मुलाने तीन प्रकारची नाणी वेगवेगळी करण्याची यांत्रिक पद्धती शोधली होती. दुसऱ्या एकाने दाराला असलेल्या लॉकला जर कोणी हात लावला तर विशिष्ट गाण्याची धून वाजायची अशी यंत्रणा तयार केली होती. असे कितीतरी नावीन्यपूर्ण छोटे छोटे प्रकल्प मुलांनी हाती घेतले होते.

१३ ते १८ वयोगटांतील मुलांचे प्रकल्पही आकर्षक होते. संशोधनातील वैविध्य पाहून तर, आम्हीही स्तिमित झालो. एकाने रक्तातील साखरेचं प्रमाण शोधून काढण्यासाठी लाळेतील ग्लुकोजचं प्रमाण शोधून काढून ते जवळ सारखंच असल्याचं सिद्ध केलं होतं. त्यासाठी माणसाचं रक्त टोचून काढणं टाळता येणार होतं. या संशोधनासाठी त्यानं Herbe People's Hospital येथे काम केलं होतं.

युनान प्रांत हा शेतीप्रधान असल्याने तेथे हरित गृहे खूप होती. त्यावर पांढऱ्या प्लॅस्टीकचे आवरण असते. त्याऐवजी एका मुलाने अशा हरित गृहासाठी साध्या प्लॅस्टीकऐवजी निळसर रंगाचे प्लॅस्टीक तयार केले होते. ज्याने प्रकाश किरणांतील Ultra Violet किरणांचे रूपांतर निळ्या व लाल रंगांच्या किरणांत होत होते, जे वनस्पतींसाठी उपयोगी असते. एका विद्यार्थिनीने पारंपरिक पद्धतीने अन्न शिजवल्याने पदार्थातील कॅल्शियम कमी होते पण मायक्रोव्हेवमध्ये पदार्थ शिजवल्याने पदार्थात कॅल्शियम तसेच राहते हे शोधून काढले होते. स्त्रियांनी गर्भावस्थेत या पद्धतीने शिजवलेले अन्न खावे, असा निष्कर्ष या विद्यार्थिनीने काढला होता.

एका १८ वर्षाच्या मुलीने समुद्रातील एकपेशीय प्राण्यांचा उपयोग Anti tumer agent बनविण्यासाठी केला होता. या तिच्या संशोधनाचे पेटंट तिला या वयात मिळाले होते. असे विविध संशोधनात्मक काम या प्रदर्शनात पहावयास मिळाले. शेती व वैद्यकीय क्षेत्रे या संदर्भातील संशोधन जास्त प्रमाणात झालेले आढळले. या सर्व संशोधनांसाठी या शालेय विद्यार्थ्यांनाही विद्यापीठांच्या प्रयोगशाळा व तेथील अद्ययावत यंत्रसामग्री उपलब्ध झालेली होती. काही हॉस्पिटलसच्या प्रयोगशाळांतही विद्यार्थ्यांनी काम केले होते.

कुनमिंगमधील हे प्रदर्शन पहात असताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली ती म्हणजे या मुलांवर लहानपणापासूनच संशोधन करण्याचे 'संस्कार' झाले होते. 'स्वतःला पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरं स्वतःच शोधून काढा' ही वृत्ती जोपासली गेली होती. त्यासाठी लागणाऱ्या सुविधा, पैसा या गोष्टी त्यांना पुरविल्या गेल्या होत्या.

घोकंपट्टी करून उत्तम गुण मिळविणाऱ्या आपल्या मुलांना ही शिक्षणपद्धती उपलब्ध होईल का? हा प्रश्न आम्हा सर्वांच्या मनात पुन्हा पुन्हा डोकावत होता.

संपूर्ण चीनमध्ये जगातील सर्व ज्ञान त्यांच्या भाषेत उपलब्ध करून दिलेले आहे. मातृभाषेतील शिक्षण हे प्रगतीचे एक प्रभावी कारण असू शकेल. अगदी इंटरनेटसाठीही चिनी भाषेचाच उपयोग केलेला होता. संगणकावरही चिनी लिपी पाहून आम्ही चकित झालो.

आदल्या दिवशी अनेक मोठमोठ्या कंपन्यांनी मुलांना भरघोस बक्षीसे वाटली. हा समारंभ World Expo Horting Garden येथे होता. त्यावेळी काही सांस्कृतिक कार्यक्रम दाखविले गेले. कंपन्यांचे बॅनर्स कोठेही नव्हते. दुसऱ्या दिवशी सरकारतर्फे पुरस्कार दिले गेले. व्यासपीठ भव्य व आकर्षक होते. पण तिथं टेबलखुर्च्यांची गर्दी नव्हती. एका बाजूला फक्त सुंदर पुष्प रचना होती. लंबीचवडी भाषणं. नव्हती, कम्युनिस्ट पक्षाचा कुठेही बॅनर नव्हता. इथेही मुलांना भरपूर बक्षीसे दिली गेली. सर्वोत्तम प्रकल्पांतील मुलांना 'बिजिंग' विद्यापीठात प्रवेश परीक्षेशिवाय थेट प्रवेश दिल्याचे जाहीर करण्यात आले.

हे सर्व पाहिल्यावर अनेक प्रश्न आम्हां भारतीयांच्या मनात उभे राहिले. आपल्याकडे मुलांना इतके प्रोत्साहन मिळते का? फिल्म ॲवार्डसाठी पाण्यासारखा पैसे खर्च करणाऱ्या कंपन्या विद्यार्थ्यांसाठी काय करतात? पक्षांची अधिवेशने, प्रचारसभा, बॅनर्स इ. असंख्य गोष्टींसाठी पैसा उधळला जातो. पण शिक्षण क्षेत्रासाठी मात्र गंगाजळीत खडखडाट असतो. आपले मंत्री परदेशदौरा करून येतात पण खरोखरच त्यांचे डोळे उघडले जातात का? आपल्याकडील सर्वांनीच अत्मपरीक्षण करण्यांची वेळ आली आहे, असे जाणवले.

(क्रमशः)

सौ. अपर्णा सतीश भोळे
A.M.B.A.
सौ. आनंदीबाई जोशी,
इंग्रजी माध्यम शाळा,
नौपाडा, ठाणे- ४०० ६०२.

•••

## भगवद्गीता - संक्षिप्त माहिती

**भगवद्गीतेतील तत्त्वज्ञान**

मन कोणत्या भौतिकतत्वाने घडल आहे किंवा ते मुळीच भौतिक नाही या विषयी कोणत्याही तत्त्ववेत्त्याने निर्णायक विचार केलेला दिसून येत नाही. उपनिषदामधील/अन्नमयं हि सौम्य मनः या सारखी वाक्य मन हे भौतिक आहे असे प्रतिपादतात. मनाचे बुद्धिप्रधान, (ज्ञान) भावना प्रधान (भक्ती) व क्रिया प्रधान (कर्म) असे तीन विभाग तत्त्ववेत्यांनी केलेले आढळतात. बुद्धिप्रधान मन असलेल्या माणसांचे प्रमाण अत्यल्प, कारण इंद्रिये व त्यावर अधिकार चालवणारे मन ही दोन्ही ताब्यात ठेवणारी बुद्धि/स्थित प्रज्ञ माणसे फारच क्वचित आढळतात, पण निष्काम रीतीने पुण्यकारक कर्म करण्यात त्याची शक्ती खर्च करणे हे मनुष्याला कठीण असले तरी, शक्य आहे म्हणून सामान्य जनतेच्या दृष्टीने 'कर्मयोग' पुरूषार्थ मिळवून देण्याच्या मार्ग गीतेत प्रामुख्याने प्रतिपादलेला आढळतो. मन ताब्यात राहावे म्हणून परमेश्वराचे चिंतन ध्यान, अनुस्मरण इत्यादी मध्येच मन सदा गुंतवून ठेवून त्या मनोवृत्तींना अनुकूल अशीच कर्मे करण्यात इंद्रिये गुंतविणे अशा प्रकारचा भक्तिमार्ग ही भावना प्रधान मनाच्या व्यक्तीकरता भगवद्गीतेत सांगितली आहे.

- शं. बा. मठ

# परिसर वार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा. वि.)

- सोमवार दि. ९ जुलै रोजी इ. ८वी च्या सर्व विद्यार्थ्यांनी 'न्यू इंग्लिश स्कुल' जवळील 'शुभंकरोती हॉल' येथील किल्ल्यांच्या छाया चित्रांच्या प्रदर्शनास भेट दिली. दुर्गप्रेमी श्री. सुरेश वाडकर तेथे उपस्थित होते. छायाचित्रकार श्री. प्रवीण भोसले यांची विद्यार्थ्यांनी मुलाखत घेतली.

- मंगळवार दि. १० जुलै रोजी माहिती तंत्रज्ञानाच्या महत्त्वपूर्ण विषयाला शालेय जीवनापासून सुरूवात व्हावी. ही काळाची गरज ओळखून श्री. विवेक सावंत यांनी स्वत: तयार केलेली MSCIT अभ्यासक्रमावर आधारित CD इ. ८ वी च्या विद्यार्थ्यांना दाखविण्यात आली.

- 'डॅनटेक डॅटल केअर सॅटर' ठाणे तर्फे दि. १२ जुलै रोजी इ. ५ ते ८ वी च्या विद्यार्थ्यांची मोफत दंत तपासणी करण्यात आली.

- १२ जुलै रोजी संपूर्ण देशात सर्वप्रथम महाविद्यालयाचे चित्रपट मंडळ स्थापन करण्याचा बहुमान मिळालेल्या जोशी-बेडेकर मंडळाच्या उद्‌घाटन प्रसंगी शाळेच्या उपमुख्याध्यापिका सौ. उषा कळमकर, पर्यवेक्षिका सौ. देशपांडे व सौ. दांडेकर, सौ. लोखंडे व सौ. सुमिता माने या शिक्षिका उपस्थित होत्या.

- सन ०७-०८ या शैक्षणिक वर्षासाठी पालक-शिक्षक संघाची स्थापना दि. १४ जुलै रोजी विद्यालंकार हॉल येथे करण्यात आली. सभेस उपमुख्या. सौ. कळमकर, पर्यवेक्षिका सौ. देशपांडे ज्येष्ठ शिक्षक श्री. गवई व प्रमुख पाहुणे सौ. रजनी करंदीकर उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सौ. लोखंडे यांनी केले.

- स्काऊट गाईड कार्यालय ठाणे येथे दि. १८ जुलै रोजी स्काऊटस् व गाईडस् यांसाठी आयोजित चर्चासत्रास ठाणे जिल्ह्यातील ५० शिक्षक उपस्थित होते. सदर चर्चासत्रास सौ. लोखंडे यांनी मार्गदर्शन केले.

- १८ जुलै रोजी जाहीर झालेल्या संस्कृत शिष्यवृत्ती परीक्षेच्या निकालात शाळेतील तीन विद्यार्थ्यांनी देदीप्यमान यश मिळविले. प्रमोदिनी सकपाळ (ठाण्यात दुसरी), कौस्तुभ बांबरकर (ठाण्यात पाचवा) व मयूर देवकर (ठाण्यात सहावा) आला. शाळेचा निकाल १००% लागला असून मार्गदर्शन श्री. धोंडे यांनी केले होते.

- इ. १०वी च्या पुनर्रचित अभ्यासक्रमाच्या प्रशिक्षणास शाळेतील सौ. ज्योती सोमण या तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या.

- पर्यावरण प्रकल्पांतून वैज्ञानिक दृष्टिकोन अंगिकारण्यासाठी प्रकल्पांकडे कोणत्या दृष्टिकोनातून पहावे याचे मार्गदर्शन शाळेचा माजी विद्यार्थी कु. अभिजित जाधव याने २७ जुलै २००७ रोजी १० अ च्या विद्यार्थ्यांना केले.

- दि. २७ जुलै रोजी श्री. जानी-शारदा बिल्डून फिल्मस् डोंबिवली यांच्यातर्फे ५ ते ७ च्या विद्यार्थ्यांना 'द स्कूल' व ८वी च्या विद्यार्थ्यांना 'मला जगायचंय' हे चित्रपट दाखविण्यात आले.

- ३० जुलै रोजी ५ ते ८ वी च्या सर्व वर्गांमधून शिक्षकांच्या उपस्थितीत गुरुपौर्णिमेचा कार्यक्रम साजरा झाला.

- दि. २८ जुलै रोजी 'स्टार माझा' या दूरदर्शन वाहिनीवर इ. १० अ च्या विद्यार्थ्यांचा 'आजच्या विद्यार्थ्यांची गुरुपौर्णिमा' या विषयावर चर्चात्मक कार्यक्रम प्रसारित झाला.

- 'ज्ञानसाधना व अभिमान प्रतिष्ठान' ठाणे यांच्यातर्फे मार्च ०७ च्या शालान्त परीक्षेत ठाण्यातील ८५ शाळांचा निकाल ९०% पेक्षा अधिक लागला, त्यांना घडविणाऱ्या मुख्याध्यापक व शिक्षकांचा सत्कार सोहळा ३० जुलै रोजी डॉ. मगरे (शिक्षण क्षेत्रातील मान्यवर) यांच्या शुभहस्ते करण्यात आला. या कौतुक सोहळ्यास उपमुख्या. सौ. उषा कळमकर उपस्थित होत्या.

- दि. २८ एप्रिल रोजी स्थापन झालेल्या माजी विद्यार्थी संघाची तिसरी सभा दि. २८ जुलै रोजी मुख्याध्यापिका सौ. सविता केळकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

- इ. ९ वी च्या विद्यार्थ्यांचा गुरुपौर्णिमेचा कार्यक्रम ३१ जुलै रोजी विद्यालंकार हॉलमध्ये संपन्न झाला. कार्यक्रमास माजी विद्यार्थीनी कु. विद्या गायकवाड या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आशा जोशी यांनी केले.

- दि. ३० जुलै रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथिनिमित्त शाळेत वक्तृत्व व हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आल्या. १ ऑगस्ट - लोकमान्य टिळक पुण्यतिथिनिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमास कथाकथनकार वि.भा. काळे ह्या उपस्थित होत्या. 'असे होते टिळक' या त्यांच्या व्याख्यानातून त्यांनी टिळकांच्या विविध गुणांचा विद्यार्थ्यांना परिचय करून दिला. त्यांच्या शुभहस्ते वक्तृत्व व हस्ताक्षर स्पर्धेतील विजयी विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सौ. संध्या सावंत यांनी केले. कु. बावुले यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळा (प्राथमिक विभाग)

- हंगेरी येथे पार पडलेल्या इंटरनॅशनल जपान कराटे असोसिएशनच्या आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत मुलींच्या गटात आर्या दातारने चौथा क्रमांक पटकाविला.



कु. आर्या दातारे



कु. नेहा दिक्षित

नवी मुंबई स्पोर्टस असोसिएशनतर्फे आयोजित केलेल्या ठाणे जिल्हा स्तरावरच्या बॅडमिंटन स्पर्धेत कु. नेहा दिक्षित हिला प्रथम क्रमांक मिळाला.

**सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळा (माध्यमिक विभाग)**

### माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन

शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कालिंदी कोल्हटकर यांच्या पुढाकाराने माजी विद्यार्थी संघाची पुनर्स्थापना झाली. त्यांचे हे स्वप्न पूर्ण होण्यासाठी विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

१९७६ मध्ये शाळा सुरू झाली. दहावीची पहिली बॅच १९८२ साली उत्तमरीत्या पास होऊन बाहेर पडली. हेच १९८२ चे विद्यार्थी २५ वर्षानंतर एकत्र आले.

६ जानेवारी २००७ रोजी कोल्हटकर मॅडम आणि काही ज्येष्ठ शिक्षकांच्या मदतीने ६ माजी विद्यार्थ्यांचे एक मंडळ स्थापन करण्यात आले. मंडळाचे सदस्य सौ. मनिषा जोशी, श्री. संग्राम जोशी, श्री. सुनील कुलकर्णी आणि श्री. उपेंद्र मुजुमदार.

आतापर्यंत २०० च्या वर माजी विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी केली आहे आणि ही संख्या वाढतेच आहे.

७ जुलै २००७ रोजी शाळेच्या सभागृहात पहिले स्नेहसंमेलन पार पडले. १९८२ च्या वर्षातील ज्या विद्यार्थ्यांना शक्य होते ते तर आलेच होते परंतु नाशिक, पुणे, मॉरिशस, अमेरिका इ. ठिकाणी गेलेले विद्यार्थीही फोन करून संपर्क ठेवून होते. कोल्हटकर मॅडमच्या स्वागतपर भाषणाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. त्यांनी आपल्या भाषणात थोडक्यात शाळेच्या प्रगतीचा आलेख मांडला. १९८२ च्या बॅचचा विद्यार्थी मितेश कुलकर्णी यांनी ए.के.जोशी परिवारातील जे लोक आपल्याला सोडून गेले आहेत त्यांना श्रद्धांजली वाहिली.

१९८२ बॅचच्या प्रत्येक विद्यार्थ्याने आपले शाळेतील अनुभव सांगितले. शाळेची नवीन सुरूवात असल्यामुळे विद्यार्थी आणि शिक्षक दोघांच्याही शिकण्याचा काळ होता तो! पटेल मॅडमच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक, विद्यार्थी सर्वच अनुभवाने समृद्ध होत होते. साधन साहित्याची कमतरता कधीच यशाच्या मार्गातील अडचण ठरली नाही. संगीत शिक्षिका सौ. वीणा जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेल्या शाळेच्या 'आनंदवृंद' या वाद्यवृंदाने संध्याकाळ सुरेल केली. माजी विद्यार्थ्यांच्या आग्रहावरून शाळेची प्रार्थना म्हटली गेली, जी त्यांना २५ वर्षापूर्वीच्या काळात घेऊन गेली.

माजी विद्यार्थ्यांनी फक्त त्यांच्याच शिक्षकांचा नाही तर ए.के. जोशी परिवारातील विद्यमान शिक्षकांचा ही गौरव केला. तसेच कोल्हटकर मॅडम ना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

सगळ्यांसाठी उत्तम भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी समारोपाच्या भाषणात शाळेने केलेल्या संस्कारामुळेच त्यांच्यात आज सहृदयता, मानवतावाद यासारखे गुण रुजल्याचे तसेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास झाल्याचा उल्लेख केला. आता वारंवार एकमेकांना भेटण्याची इच्छा व्यक्त करत शिक्षक व विद्यार्थ्यांनी एकमेकांचा निरोप घेतला.

- सेंट जॉन बाप्टिस्ट हायस्कूल येथे आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय टेबल टेनिस स्पर्धेत कु. ऋचा अमडेकर (८वी अ) ही विजेती तर कु. वृषाली प्रसादे (८वी अ) ही उपविजेती ठरली.
- युनायटेड कॉन्सिलने आयोजित केलेल्या राष्ट्रीय स्तरावरील 'विज्ञान प्रज्ञा शोध परीक्षा - २००७ मध्ये कु. वृषाली प्रसादे (८ वी अ) ही मुंबई विभागात

प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली. आपल्या शाळेतील आणखी तीन विद्यार्थी ह्या परीक्षेस बसले होते.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

बांदोडकर महाविद्यालय द्वितीय वर्ष व तृतीय वर्ष विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी दिनांक ११ जून २००७ रोजी सकाळी १०.०० वाजता थोरले बाजीराव पेशवे सभागृहात मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केले होते. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. श्रीमती माधुरी पेजावर आणि उपप्राचार्या श्रीमती अकोलकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

- बारावीच्या विद्यार्थ्यांकरिता दिनांक १६ जून २००७ रोजी सकाळी १०.०० वाजता थोरले बाजीराव पेशवे सभागृहात मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केले होते. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. श्रीमती माधुरी पेजावर, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्रीयुत आर.टी. कुलकर्णी, श्रीयुत अत्तरदे आणि पर्यवेक्षक डॉ. श्रीमती बेंडिगेरी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.
- प्रथम वर्ष विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी दिनांक ०२ जुलै २००७ रोजी सकाळी १०.०० वाजता थोरले बाजीराव पेशवे सभागृहात उद्घाटनपर व्याख्यान आयोजित केले होते. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. श्रीमती माधुरी पेजावर आणि उप प्राचार्या श्रीमती अकोलकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.
- अकरावीच्या विद्यार्थ्यांकरिता दिनांक १६ जुलै २००७ रोजी सकाळी १०.०० वाजता थोरले बाजीराव पेशवे सभागृहात मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केले होते. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. श्रीमती माधुरी पेजावर, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्रीयुत आर.टी. कुलकर्णी, श्रीयुत अत्तरदे आणि पर्यवेक्षक डॉ. श्रीमती बेंडिगेरी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.
- महाविद्यालयाच्या तृतीय वर्ष विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचा निकाल ७६.९७% आहे.

महाविद्यालयातील प्रथम तीनक्रमांकाचे विद्यार्थी

| नाव | गुण | टक्केवारी |
|---|---|---|
| १. सतीश रामनारायण गुप्ता | ७१३ | ८९.१२ |
| २. शर्मिला शिवराम राणे | ६९६ | ८७.०० |
| ३. नंदालाल रविंद्र पाटील | ६७८ | ८४.७५ |

प्रत्येक विषयातील प्रथम क्रमांकाचे विद्यार्थी

| विषय | नाव | गुण |
|---|---|---|
| गणित | शेख नाझनीन शब्बिर | ६६६ |
| रसायनशास्त्र | आमोंडकर तन्वी दिलीप | ६६० |
| संख्याशास्त्र | गुप्ता सतीश रामनारायण | ७१३ |
| प्राणिशास्त्र | गोंधळी मनस्वी विजय | ६४३ |
| वनस्पतीशास्त्र | राय सारीका कल्याण | ६९६ |
| भौतीकशास्त्र | कौर रणजित सुरेंद्र | ६०९ |

महाविद्यालयाच्या एम.एस.सी रसायनशास्त्र प्रथम वर्ष व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांचा निकाल खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| प्रथम वर्ष एम.एस.सी | ८३.३३% |
| द्वितीय वर्ष एम.एस.सी | ८५.७% |

- रसायनशास्त्र विभागाच्या श्री.प्रकाश संतोष माळी त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील सहभागाबद्दल आदर्श प्रतिष्ठान ठाणे यांच्या वतीने शिक्षणरत्न २००७ या पुरस्काराने गौरवण्यात आले.
- पा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या गणित विभागाच्या विभागप्रमुख सौ. मीनल पानखेडे घरसागडे गणित विभाग प्रमुख यांना चतुर्थ अखिल भारतीय प्रतिभा सन्मान पुरस्कार समारोह वर्ष २००७ चा महात्मा ज्योतीबा फुले शिक्षा विद्रु शिक्षा पुरस्कार प्राप्त झाला.

**महिला गट अहवाल**

- महिला गटाच्या कार्यक्रमाची सुरुवात शनिवार दिनांक २८ जुलै २००७ रोजी डॉ. **संध्या माइनकर** प्रमुख बिझिनेस कक्ष यांच्या हस्ते झाली. त्यांनी आपल्या आरोग्याची काळजी आपल्या कामाच्या ठिकाणी घेणे कशी आवश्यक आहे हे विद्यार्थ्यांना पटवून दिले. विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालय हे त्यांच्या कामाची जागा आहे व त्यांनी महाविद्यालयात देखील स्वच्छता ठेवली पाहिजे यावर भर दिला.

**योगा समिती**

२००७ सालचे योगवर्ग दिनांक २२ जून ते २५ जुलै २००७ या कालावधीत घेण्यात आले. या योगवर्गामध्ये २३ विद्यार्थी व ३ स्टाफ मेंबर देखील सहभागी झाले होते. त्यापैकी १५ विद्यार्थी व १ स्टाफ मेंबर यांनी संपूर्ण क्लास अटेंड केला.

या योगवर्गाच्या निरोप समारंभाला अंबिका योग कुटीरचे श्री. सुर्वेजी व श्री. फटकरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच योगवर्गाला श्री. व सौ. दिक्षित यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

**रसायनशास्त्र कार्यशाळा अहवाल**

- बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयामध्ये दिनांक ०६ ऑक्टोबर २००७ रोजी Contaminants in Food and Beverages या विषयावर एक परिषद आयोजित करण्यात येणार आहे. त्या परिषदेच्या तयारीसाठी दिनांक २७ जुलै २००७ रोजी थोरले बाजीराव पेशवे सभागृहात सकाळी १०.०० ते दुपारी १.०० या वेळेत एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचे उद्घाटन डॉ. राजन शास्त्री यांच्या हस्ते झाले. ते Sandoz India Limited च्या In Agrochemical Division मध्ये Sr. Scientist या पदावर कार्यरत आहेत.

त्यांनी कंटॅमिनंटस हे अन्न व पेयांमध्ये विविध मार्गे कसे येतात हे बल्क ड्रग्ज प्रोसेस्ड फुड यांचा संदर्भ देऊन दाखवून दिले.

महाविद्यालयातील डॉ. मोझेस कोलेट प्राणिशास्त्र विभाग यांनी 'मायटोटॉक्सिन अॅज कंटॅमिनंट इन फूड' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

ज्ञानसाधना महाविद्यालयाचे रसायनशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. पंडित यांनी 'डिटेक्शन अॅन्ड डिटरमिनेशन ऑफ सल्फोनामाइडस रेसिड्यूस इन फुड प्रॉडक्टस' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

ज्ञानसाधना महाविद्यालयाचे रसायनशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. चव्हाण यांनी 'कंपोनंटस ऑफ फूड अॅन्ड कंटॅमिनंटस' या त्यांच्या पेपरचा गोषवारा येथे सादर केला. महाविद्यालयातील काही विद्यार्थ्यांनीही निबंध सादर केले.

| विद्यार्थ्यांचे नांव | निबंधाचे नाव |
|---|---|
| १. कु. राजेश काळे | इफेक्ट ऑफ फंगाय ऑन डिफरंट स्पीसीज |
| २. कु. पूजा दांडेकर | कंटॅमिनेशन इन फूड ऑइल |
| ३. कु. रघुनाथ | कोका कोला केस विथ स्पेशल रेफरन्स टू पेस्टिसाइडस रेसिड्यूज |

कु. स्वरिका तिवारी हिने आभारप्रदर्शन करुन कार्यक्रमाची सांगता केली.

**विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन**

- महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई उन्हाळी २००७ च्या द्वितिय व तृतीय वर्षांचे निकाल जाहीर झाले असून त्यात वि.प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांनी चांगले घवघवीत यश संपादन केले आहे.

गुणपत्रिका वितरण समारंभ १८ जुलै २००७ रोजी वि.प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनच्या दृक श्राव्य सभागृहात सकाळी ११.०० वाजता पार पडला. तंत्रनिकेतनमध्ये अव्वल क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना गुणपत्रके देण्यात आली. या समारंभास वि.प्र.मंडळाचे तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि.कृ. नायक, माजी प्राचार्य प्रा. एस. एस. मुजुमदार व प्रा. व्ही.एस. भाकरे, इत्यादी मान्यवरांच्या हस्ते गुणपत्रके देण्यात आली. सदर समारंभास मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

तंत्रनिकेतनमध्ये अव्वल क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची अभ्याक्रमानुसार नावे व गुण खालीलप्रमाणे

**द्वितीय वर्ष**

| नाव | अभ्यासक्रम | टक्केवारी |
|---|---|---|
| १. देवाडिगा तुषार जगन्नाथ | CH | ७८.०८ |
| २. जाधव राहूल लक्ष्मण | EP | ७४.७२ |
| ३. सावंत अजिंक्य किशोर | IE | ८२.८१ |
| ४. गुरव तुषार चंद्रकांत | IS | ६७.२६ |
| ५. सिंग शशांक राजेंद्र तारा | IF | ७६.६७ |
| ६. गाहवे प्रतिमा लक्ष्मण | CO | ७८.१६ |
| ७. भट प्रसाद श्रीनिवास | MU | ७२.०० |

**तृतिय वर्ष**

| नाव | अभ्यासक्रम | टक्केवारी |
|---|---|---|
| १. मुकादम जासीम वझीर | CH | ८२.०० |
| २. ठेकेदार कल्याणी मिलिंद | EP | ७६.३८ |
| ३. शेणॉय सिद्धेश शशीकांत | IE | ८४.५४ |
| ४. बोंडे दिपक प्रकाश | IS | ८२.३५ |
| ५. जोशी सुरज विजय | IF | ८१.०८ |
| ६. समर्थ प्रियांका राजन | CO | ७६.५६ |

**Industrial Safety**

| | | |
|---|---|---|
| १. कांवळे धर्मानंद भानुदास | IT | ७६.९१ |

वरील यशस्वी विद्यार्थ्यांचे वि.प्र.मंडळाचे तंत्रनिकेतनाचे प्राचार्य दि. कृ. नायक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

### पोलिस - शिपाई प्रशिक्षण सहकार्य

ह्यावर्षी महाविद्यालयाला पोलिस-शिपाई प्रशिक्षणात सहाकार्य करण्यासंबंधी विचारणा करण्यात आली. आम्हांस श्रीमती अर्चना त्यागी, अधिक्षक (ठाणे ग्रामिण पोलिस) यांनी एका पत्राद्वारे नव्यानेच नेमणूक झालेल्या ३५० पोलिस शिपायांना कायद्याचे प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षक पाठविण्याची विनंती केली. खालील व्यक्तींचा प्रशिक्षक म्हणून संघ बनविण्यात आला व पोलीस शिपायांना प्रशिक्षण देण्यासाठी पाठविण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| श्रीम. श्रीविद्या जयाकुमार | प्रभारी प्राचार्या समायोजक | प्रशिक्षक |
| श्रीम. जान्हवी नवरे | व्याख्याती | प्रशिक्षक |
| श्री. गोपीचंद खाडे | माजी विद्यार्थी | प्रशिक्षक |
| श्रीम. विद्या गायकवाड | माजी विद्यार्थी | प्रशिक्षक |
| श्री. अमित पाटील | माजी विद्यार्थी | प्रशिक्षक |
| श्री. विशाल चव्हाण | माजी विद्यार्थी | प्रशिक्षक |

प्रशिक्षण आग्रव अकादमी मामनोली, कल्याण येथे ऑगस्ट ते नोव्हेंबर २००६ दरम्यान घेण्यात आले. महाविद्यालयाने संबंधीत प्रशिक्षणार्थींची परिक्षा घेऊन निकाल जाहीर करण्याची जबाबदारी पार पाडली.

**बी.लिब.एस.सी निकाल**

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयामध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे बी. लिब.एस.सी चे वर्ग घेण्यात येतात. २००७ वर्षातील बी. लिब. एस.सी च्या विद्यार्थ्यांचा निकाल ७३.५२% आहे. श्री. प्रविण गोविंद पुरळकर हे ६९.१७% गुण मिळवून अभ्यासकेंद्रात प्रथम आले.

**प्राणिशास्त्र क्लब**

- ग्रीन फोर्स नेचर क्लब चे उद्घाटन गुरुवार दिनांक १९ जुलै २००७ रोजी श्रीमती अलका भागवत यांच्या हस्ते झाले. त्यांनी फुलपाखरे व त्यांच्या दुर्मिळतेबद्दलची सर्वांना माहिती करुन दिले. त्यांनी त्यांच्या स्लाईड शो मार्फत विद्यार्थ्यांना फुलपाखरांच्या शेतीसाठी प्रवृत्त केले.
- या कार्यक्रमाला प्राचार्या, उपप्राचार्या तसेच विविध विभागांचे विभाग प्रमुख उपस्थित होते. तसेच २० शिक्षक व शिक्षकेतर सहकारी आणि १०० विद्यार्थी उपस्थित होते.

•••

दिशा
नियमित वाचा

मुखपृष्ठावरून

**संपादकीय- शैक्षणिक अनुभव देणारी चीन भेट**

केलेल्या आजवरच्या सहली केवळ यशस्वीच नव्हे तर अत्यंत उपयुक्त ठरल्या आहेत. आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या सहलीसाठी देखील या संस्थेने सहकार्य केले व त्यातून ही सहल झाली.

या सहलीतील अनुभवांवरून आधारित असा लेख आम्ही या अंकात दिला आहेच. शिवाय या प्रकल्पकांबरोबर गेलेले होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राचे डॉ. सुधाकर आगरकर यांचा लेखही विशेष लेख म्हणून देत आहोत. सौ. अपर्णा भोळे यांना त्यांच्या पुढील लेखांबरोबर विद्यार्थ्यांनी त्यांचे अनुभव लिहून काढावेत, अशी विनंती करावयास आम्ही सांगितले आहे. त्यातील काही अनुभव विद्यार्थ्यांच्या शैलीत आपण जाणून घेऊ शकू.

या लेखांत चीनमधील कुनमिंग शहरात झालेल्या या कार्यक्रमाची जी माहिती येते, त्यातील लहान सहान बाबींवरून खूप काही शिकण्यासारखे आहे. पारितोषिक वितरणासारखे कार्यक्रम अवडंबर न माजवता साध्या रीतीने करण्याची पद्धत, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यामागील तळमळ अशा कितीतरी बाबी अनुकरणीय आहेत. हायड्रोपॉनिक्स सारख्या कठीण विषयांवर प्रकल्प करण्यास प्रोत्साहन देणाऱ्या मार्गदर्शन करणाऱ्या आमच्या शाळेतील शिक्षिकांची देखील विशेष नोंद घेणे आम्हास आवश्यक वाटते. अमला, साहील, निकिता व निहारिका या आमच्या विद्यार्थ्यांना या शैक्षणिक भेटीतून आम्ही सुरवातीस म्हटल्याप्रमाणे संस्कार करणारा, चिरस्मरणीय असा अनुभव नक्कीच मिळाला आहे.

या लेखांबाबत आपल्या प्रतिक्रिया आम्हाला अवश्य कळवा. आपल्या प्रतिक्रियांचा पुढील वाटचालीत होणारा उपयोग फार महत्त्वाचा आहे.

•••